वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास....................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .......०१

Rs.
per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..............................4as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

VOL XXIV AKOLA MONDAY 10 FEBRUARY 1890 NO 6

वर्ष २४ अकोला सोमवार तारीख १० माहे फेब्रुवारी सन १८९० इ० अंक ६

## पाक.

सालंमीश्री पाक घेतला असतां धातुची म जबुती होऊन शक्ती वाढते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ४१ दिवस घ्या.

बदाम पाक घेतला असता, मस्तकांतील उष्णता दूर होते डोळ्यास थंडावा येतो. धातु पुष्ट होते बळयेते दरदिवस ३ तोळे प्रमाणें ३० दिवस घ्या.

गोखरूचा पाक घेतला असतां मूत्र मार्गात होणारी आग, तिडका, जुनापरमा, मेहरोग मूत्र पुष्कळ आणि गढूळ होते तो तो, हे रोग दूर होऊन धातु शुद्ध होते बळ येते स्त्री संगाची इच्छा होते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ६० दिवस घ्या.

कोहळे फळाचा पाक घेतला असतां डोळ्यास येणारी अंधारी भोवळ पिताचे उपद्रव हे रोग दूर होऊन रक्तशुद्ध होते धातु पुष्ट होते बळयेतें दरादिवस ३ तोळे प्रमाणें ४१ दिवस घ्या.

वर लिहिलेले पाक मागविण्याची रीत

| तोळे | किंमत रुपये | पोष्टेज |
|---|---|---|
| १६ | १ | ०९ |
| ३२ | २ | ०।३ |
| ४८ | ३ | ०।३ |
| ६४ | ४ | १०१ |
| ८० एकशेर | ५ | पोष्टेज माफ. |

पत्ता गजानन बाळकृष्णा वैशंपायन पेठ सदाशिव पुणें.—

## जाहीरात.

सर्वत्रास कळण्यास्तव दिल्हीं जातिकीं केळासवासी पुरुषोत्तम पांडूरंग खान झोडे यांचे घर येवतमाळी आहे ह्याची चतुःसिमा पुर्वेस भिकु तात्याचे घर पश्चिमेस रामचंद्र भिकाजी यांचें घर दक्षीणेस सडक उत्तरेस आपाजी बळवंत याचे वर आवार व बांधीव नागा मय त्यास तीन पुत्र आहेत १ श्रीधर पुरुषोत्तम २ दामोदर पुरुषोत्तम ३ अज्ञान जनार्दन पुरुषोत्तम अज्ञानाची आई हीनें मुलीचे लग्न करितां जो खर्च झाला त्या करितां खरेदी देण्या करितां तारीख १२ दिसेंबर १८८९ रोजी यव्हर्याचा वेंडर गणेश भास्कर याज पासून ४९३ नंबरचा पांच रुपयाचा टांप आणिला तो रद्द समजावा तिचांचे संमती खेरीज ( जनार्दन पुरुषोत्तम सावत्र आईचा मुलगा आहे ह्या पासून ) खरेदी अगर गहाण घेईल तर ते आह्मांस ना मंजुर आहे आह्मी आमचे हिशा प्रमाणें लग्नाचा खर्च देण्यास कबूल आहे

सही
श्रीधर पुरुषोत्तम खानझोडे.
दस्तुर खुद्द

## जाहीरात.

सर्व लोकांस कळविण्यात येतें कीं तारीख ३१ माहे जानेवारी सन १८९० इसवी रोजीं अकोलें ते सोहागपूर या स्टेशनचे दरम्यान आगगाडीतून आमच्या नोटा दर १० दहा प्रमाणें सात ७ कींमत रुपये ७० च्या खाली लीहिलेल्या नंबरच्या, चोरीस गेल्या आहेत त्या नोटाच्या मागें इंग्रजित येस. आर. के. व तारीख २९-१-९० असें सीस्पेन्शीलीने सही केली आहे. या प्रकारच्या नोटा कोणाच्या दृष्टीस पडल्यास त्यास अटकावून ठेऊन पोलीसचे ताब्यांत द्यावें कळावें.

| | | |
|---|---|---|
| S/50 | 61866 | मुंबई ता. ५-३-८७ रु. १० |
| S/51 | 18131 | मुं ता. ७-३-८७ रु. १० |
| S/52 | 62613 | मुं. ता. ८-३-८७ रु. १० |
| S/53 | 62614 | मुं. ता. ८-३-८७ रु. १० |
| S/52 | 62615 | मुं. ता ८-३-८७ रु. १० |
| S/52 | 62616 | मुं. ता. ८-३-८७ रु. १० |
| S/52 | 62617 | मुं. ता. ८-३-८७ | १० |

येणे प्रमाणें नोटा आहेत. ता. ५-२-९० इसवी.

सही
श्रीनीवास रामचंद्र कोर्डे राहणार अकोला वऱ्हाड.

## जाहीरात

वऱ्हाडांतील सर्वत्र जमेदार लोकांस विनंती पूर्वक कळविण्यांत येतें कीं ता. १९ माहे जानेवारि सन १८९० इ. रोजीं अकोल्यास भरलल्या जमेदार लोकांच्या सभेत ठरल्या प्रमाणें वऱ्हाडचे जमीदार लोकांची जाहीर सभा रविवारी ता. २३ मार्च सन १८९० रोजीं अकोलें येथें भरणार आहे सबब ज्या ज्या जमिदार लोकांनीं ह्या सभेच्या खर्चा करितां वर्गणी देण्याची इच्छा असेल त्यांनीं आपली नांवें सेक्रेटरी यांस ता १५ फेब्रुवारीचे आंत कळवावीं व वर्गणीची रकम ही लवकर पाठवून द्यावी. त्याच प्रमाणें अकोलें येथें ता. १९ रोजीं ज्या लोकांनीं वर्गणी देण्याचे कबूल केलें आहे त्यांनीं आपली वर्गणी आठ दिवसाचे आंत पाठवून द्यावी कळावें ही विनंती.

अकोलें तारीख २१ माहे जानेवारी सन १८९० इ.

गोविंद विश्वनाथ देशपांडे बाळापूर
सभेचे सेक्रेटरी

## जाहीरात.

यंदाचा वऱ्हाड हायस्कूल विद्यार्थी समाज अकोले येथें तारीख ६ व तारीख ७ मार्च ( गुरुवार व शुक्रवार ) रोजीं भरणार आहे. व त्यासंबंधें निमंत्रण पत्रें ठिकठिकाणी पाठविली आहेत. ज्या ज्या मंडळीची नांवें कळलीं व पत्ते कळले त्यांजकडे पत्रें पाठविली आहेत. याशिवाय बरीच मंडळी अशी राहिली असेल कीं ती वऱ्हाडांतील हायस्कूलचे माजि विद्यार्थी असून समाजाचे मेंबर होण्यास लायक आहेत पण त्यांस निमंत्रणपत्रें गेलीं नाहींत. अशा गृहस्थास आमची विनंती आहे कीं त्यांस समाजास निमंत्रण नाहीं असें समजू नये. त्यांनीं ही समाजास येण्याचे करावे. पत्ते माहीत नसल्यामुळें त्यांस निमंत्रणपत्रें पाठवितां आलीं नाहींत समाजाच्या वर्गणीचे दर तीन आहेत वर्ग पहिला १ रुपया. वर्ग दुसरा २ रुपये. व वर्ग तिसरा ५ रुपये. ज्यांनीं त्यांनीं आपल्या ऐपती प्रमाणें ही वर्गणी द्यावी हा भेदभेद मेंबरांच्या हक्कांत मुळींच नाहीं. कोणी किती ही वर्गणी दिली तरी सर्वांस सर्व हक्क सारखे आहेत पण समाजाचा खर्च भागली पाहिजे याकरितां सर्वांना देववेल तितकी जास्त वर्गणी द्यावी ही विनंती आहे. व व ती वर्गणी सत्वर पाठवावी अशीही सविनय सर्वांस सूचना आहे. वर्गणी पावल्याची पोंच या पत्रांतून दिली जाईल. समाजांत यंदा काय काय कामें व्हावयाचीं या संबंधाचे पत्रक लवकरच वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध होईल.

गोविंद विश्वनाथ देशपांडे
व्यंकटेश रामचंद्र मुधोळकर
अकोले ११-१-९० } सेक्रेटरी वऱ्हाड हायस्कूल विद्यार्थी समाज.

## जाहीरात

मेसर्स रायली ब्रदर कंपनीच्या शेगांवच्य शाखेस एक हजार टन वाळलेली व पांचशें ओली बाभळीची जळाऊ लाकडें तारीख १० जून सन १८९० पर्यंत मोजून व साठऊन देण्या बद्दलचे कंट्राट देण्या करितां टेंडरें मागविण्यांत येत आहेत. कंट्राट दिलेल्या मुदतीस पुरे करून दिले जाईल अशा खात्री करितां शेकडा दहा रुपये प्रमाणें अनामत रकम ठेवली पाहिजे.

टेंडरें पाठविण्याचे कागद मागविण्या करितां अथवा दुसऱ्या कांहीं माहिती करितां, मेसर्स रायलीब्रदर एजन्सी शेगांव ह्या पत्यावर पत्र व्यवहार करावा.

शेगांव तारीख १३ जानेवारी सन १८९०

सही इ. सी. रीच

वऱ्हाडसमाचार.

मिती माघ वद्य ५ शके १८११

## सन १८८८-८९ सालचा शाळा खात्याचा रिपोर्ट.

( ४ थ्या अंकावरून पुढें चालूं )

५ अकोलें येथील मिशनरी लोकांच्या व्यवस्थेखालीं असलेली बंदे शिक्षणाची शाळा चांगले स्थितीत आहे.

६ नीच जातीच्या व त्याच प्रमाणें इकडील मुळच्या राहणाऱ्या लोकांची मुलें बरीच शाळेत जाऊं लागली आहेत ह्या वर्षी नीच जातांची एकंदर १४२३ मुलें शाळेत होती.

७ स्त्री शिक्षणाची वृद्धि चांगले तऱ्हेनें होत आहे.

येणे प्रमाणें काएत्या शाळा खात्यांतील रिपोर्टातील मुख्य मुख्य मुद्याच्या गोष्टी आहेत. वऱ्हाडांत विद्या वृद्धी दिवसें दिवस अधिकाधिक होत आहे हे पाहून कोणाला हीं आनंद वाटल्या वांचून राहणार नाहीं. कोणत्या ही देशाची, प्रांतांची किंवा एखाद्या गांवाची भरभराटी होण्याला आद्य कारण शिक्षण होय. व ते जर वृद्धींगत होत आहे तर आपल्या प्रांतांचा भाग्योदयच होण्याचा समय येत चालला आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं इतर सर्व प्रांत शिक्षणाच्या संबंधानें आपल्या पुढें आहेत त्या मुळें त्यांची सुधारणा नीका हीं थोडी आमच्या पुढें गेली आहे हें सहजच आहे. इतर नावाही सुधारणा समुद्रातून भराभर पुढें जात आहेत व आपण थोडे थोडे मागे पडत आहो हें पाहून तरी आमचें प्रांतस्थ लोक या कामा कडे विशेष लक्ष देतील. अंतर जोपर्यंत थोडें आहे तो पर्यंत विचार करितां येईल एकदाचें अंतर वाढले म्हणजे फार कठीण पडेल. जरी आपल्या मध्यें सर्वांच्या पुढें जाण्याचे सामर्थ्य नाहीं व कधीं येईल किंवा नाहीं याचा संशयच आहे तरी इतरांच्या बरोबर चालण्याचीं तरी शक्ति आपल्या अंगीं असली पाहिजे. व ती ही गोष्ट सोंगी आहे असें नाहीं.

मुलांच्या शिक्षणा कडे थोडें बहुत अधिक लक्ष लोकांचे लागत चाललें आहे परंतु मुलींच्या शिक्षणाकडे लोकांचे विशेष लक्ष अद्याप लागलें नाहीं. गतवर्षी पेक्षां

या वर्षीं एकंदर २०३८ मुलें जास्त शिकत आहेत. परंतु मुली काय त्या ५२ जास्त वाढल्या आहेत. त्या वरून आमच्या समाज सुधारकांना कबूल करावें लागेल कीं सुधारणा काय ती सुधारकांच्या "तोंडांत" आहे "करणींत" नाहीं. सर्व ठिकाणीं त्याच प्रमाणें आमच्या अकोल्यांतही समाज सुधारणा करण्या करितां सभा झाल्या, व्याख्यानें झालीं, निबंध वाचले, सभा झाल्या. परंतु मुलीस कांहीं शाळेचा दरवाजा म्हणून माहित नाहीं. व घरच्या बायकांनां " श्री " देखील अद्याप काढतां येत नाहीं. व खडे मांडून हिशोब करणें जे त्यांच्या नशीबीं होतें तें अद्यापि तसेंच आहे. आमचे म्हणणें कदाचित कोणाला खरें वाटत नसेल तर त्यांनीं मुलींच्या शाळेंत जाऊन बघावें व दहा पांच ठळक ठळक सुधारणेच्छु लोकांच्या घरीं जाऊन बघावें व त्यांच्या बायांची स्थिती शिक्षणा संबधानें काय आहे हें पाहावें म्हणजे तेव्हांच समजून येईल. अमुक सुधारणा करा तमुक सुधारणा करा असें म्हणण्यास सर्व तयार आहेत. परंतु या प्रमाणें किती थोड्यांचें वर्तन आहे. पुनर्विवाहा सारख्या गोष्टी करणें जरी एक वेळ मोठे धाडसाचे व धोक्याचें काम आहे असें मानले तरी स्त्रीशिक्षण तसें नाहींना? स्त्री शिक्षण देणाऱ्याला तर कोणी वाळींत टाकीत नाहींना? तर मग ते तरी लोक कां करीत नाहींत? हें कांहीं समाजाच्या अनुकूलतेवर अवलंबून नाहीं हे प्रत्येक व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून आहे. व याला कांहीं कायदे कौन्सिलची किंवा मंडळ्याची जरूर आहे असें आह्माला वाटतही नाहीं. ह्याचा जर पसार झाला तर असें खरोखर समजतां येईल कीं लोकांच्या मनांत सुधारणा होणें व करणें इष्ट आहे नाहीं तर काय! १९ वें शतक आहे वाटेल तसें बोलावे कांहीं एक हरकत नाहीं त्या पासून दुसरे कांहीं जरी होत नाहीं तरी बोलणाऱ्यानां सुधारकाची पदवी कांहीं एक केल्या वांचून मिळते हा फायदा कां लाहान आहे.

---

राष्ट्रीय सभेनें आज पर्यंत जे ठराव केले आहेत त्या पैकींच एक ठराव असा आहे कीं पोलीस खात्यांत सुधारणा करावी. हा ठराव होंण्याचें मुख्य कारण असें आहे कीं हल्लीच्या रीती प्रमाणें लहानसहान अधिकाऱ्यांनां ह्मणजे ६ रुपयाच्या कानस्टेबलच्या हाती सुद्धा पुष्कळ अधिकार ठेवले आहेत. त्या मुळें कित्येक वेळां फार भयंकर परिणाम होतात. एखादा जमादार किंवा शिपाई कांहीं तरी कारणावरून एखाद्या इज्जतदाराची एका क्षणांत बे इज्जत करूं शकतो. याचा दोष कांहीं त्या शिपायावर किंवा जमादारावर आहे असें नाहीं. बोलून चालून जर तो ६ रुपयाच्या योग्यतेचा मनुष्य तर त्यांच्या आंगीं त्याला दिलेल्या अधिकाराचा उपयोग कसा करावा त्याजबद्दल आपणावर काय जबाबदारी आहे वगैरे ज्ञान त्याच्या आंगीं कुठून असणार आपली नोकरी करून कोणी कडून तरी आपलें पोट भरावें, आपल्या वरिष्टास खुष करावें, एवढें काय ते त्या बिचाऱ्यास माहीत. मग तो हेतु साधण्यांत कोणाचे हीत झाले काय! व कोणाचें अहित झाले काय या कडे तो कशा करितां लक्ष देणार? शिवाय अंगीं ज्ञानाचा अभाव असल्या मुळें आपापल्या अधिकाराची सर्वांना भिती असावी व त्यामुळें आपणांस सर्वांनीं श्रेष्ठ मानावें ह्या नैसर्गीक इच्छेची प्रबलता सहजच ज्यास्त होण्याचा संभव आहे.

ह्या अशा प्रकारची हल्लींची पोलीस खात्याची स्थिती असल्यामुळें वारंवार कित्येक निरापराध्यांना व इजतदार मनुष्यांना पोलिसापासून उपायापेक्षां अपाय फार होतो. नुकतेंच एक अशा प्रकारचें उदाहरण झालें आहे व त्याबद्दल त्या कान्स्टेबलवर मुकदमा ही चालू आहे तो असा कीं खामगांव तालुक्यांतील कोलोरि या गांवीं एका कुणब्याचे कांहीं कपडे पागोटी, धोतर, वगैरे चोरीस गेले. सदरहु बद्दल त्यांनीं रिपोर्ट केला तेव्हां एक पोलीस कान्स्टेबल नामें वासुदेवराव तेथें तपासा करितां आले. सदरहू कपडे एका शेतांत पडलेले सापडले ह्मणून एका इसमानें येऊन सांगितलें. तरी कान्स्टेबल साहेबाचा तपास सरला नाहीं पुढें गुन्ह्याचा तपास कसा तरी लावून द्यावा ह्मणून कान्स्टेबल साहेबांनीं त्यागावीं कांहीं कानफाटे व इतर लोक पाळे देऊन उतरले होते त्यांचा झाडा पंचासमोर घेविवला व आपण स्वतः पालाच्या पाठीमागें जाऊन " हे येथें कपडे आहेत " असें ह्मणून ते कपडे पंचाना दिले. जे कपडे शेतांत पडले होते ते व हे कपडे एकच आहेत असें पुढें समजलें. ज्यांनीं त्याबद्दल प्रथम खबर दिली होती त्या लोकांनीं ते कपडे ओळखले. झाडा रात्रीं झाल्यामुळें त्या वेळेस कपडे ओळखलें गेले नाहींत. येणेंप्रमाणें पोलिसानें त्या निरअपराधी मनुष्याविरुद्ध पुरावा बनविण्याची खटपट केली होती परंतु ती त्या लोकांच्या सुदैवानें साधिली नाहीं ह्मणून बिचारे वाचले नाहीं तर त्यांना तुरुंगाचा मार्ग पाहावा लागला असता व आमचे हुशार कान्स्टेबल बढतीच्या मार्गावर लागले असते. परंतु हल्लीं प्रकार असा झाला आहे कीं त्या कान्स्टेबल वरच निरापराधी मनुष्याला शिक्षा देण्याच्या इरादानें खोटा पुरावा तयार केल्याबद्दल इं. पी. को. कलम १९९ प्रमाणें डिपुटी कमिशनर साहेबासमोर मुकद्दमा चालू आहे. पहावें काय होते. तें वरिष्ट अंमलदारांना आपली हुशारी दाखविण्यास गेला तों त्याच्या तंगड्या त्याचे गळ्यांत पडल्या यावरून पोलिस लोक कशी कारवाई करीत असतात हें सहज लक्षांत येईल. व पोलिसांच्या पुराव्यावर कितपत विश्वास ठेवित जावा याबद्दल माजिस्ट्रेट लोकांना ह्या ज्या अशा गोष्टी वारंवार घडतात त्याबद्दल चांगला विचार विचार करीत जावा अशी आमची त्यांना सूचना आहे.

---

अकोला येथील एक्सिक्युटिव्ह ए. चे आफिसातील स्टोअर किपरची जागा खाली होऊन बरेच दिवस झाले. त्या जागीं एखादा हुशार इंग्लिश जाणणारा मनुष्य मिळावा या इराद्यानें ती जागा पुष्कळ दिवस पर्यंत रिकामी ठेऊन सदर्हू जागेला लायकीचा मनुष्य मिळण्या करितां उमेदवाराची परीक्षा घेण्याचे हो साहेब बाहादुरांनीं मनांत योजिलें. आणि त्या प्रमाणें ता. २३ आणि २४ रोजीं परीक्षा झाली. परीक्षेस निरनिराळ्या टिकाणांहून एकंदर ७ उमेदवार आले होते. या पैकीं कांहीं मुंबईहून, कांहीं उमरावतीहून व कांहीं अकोल्याहून असे होते.

ता. २३ रोजीं आफिसांत परीक्षेस यावे ह्मणून उमेदवार लोकांस लेखीं हुकूम होते. परंतु कोणते वेळी व कोणत्या विषयांत परीक्षा होणार या बद्दलचा कांहींच खुलासा केलेला नव्हता तरी बिचारे उमेदवार नेमलेल्या दिवशीं आफिसची वेळ होच परीक्षेची वेळ असेल से समजून, त्या वेळेला अफिसांत गेले. तेथें गल्या बरोबर हेडक्लार्क साहेबांनीं साहेब बाहादुराच्या बंगल्यावर जाण्यास फर्माविलें. आफिसा पासून बंगल्याचे अंतर फारच थोडे ह्मणजे रे. स्टेशन पासून पोष्ट आफिस पर्यंत. परंतु तेथें उमेदवार लोक जातांच साबाहादुरांनीं आफिसांत जाण्यास सांगितलें हे व आपण सुमारें २ दोन तासानीं आलें. व गणित विशयांत प्रश्न दिलें. परीक्षा चालू असतां व्यवस्था मात्र कडेकोट होती. जणू काय एकादी युनिव्हरसिटीचीच परीक्षा चालली आहे दोन दिवस परीक्षा झाली व येत्या सोमवारीं ता. २७ जानेवरीस निकाल कळवूं म्हणून साहेबानीं सांगितलें त्या नंतर दोन सोमवार निघून गेले परंतु निकाल कांहीं बाहेर आला नाहीं परंतु ज्या जागे करितां लायक मनुष्य पहावयाचा होता त्याचा मात्र निकाल झाला.

ती जागा हल्लीं एका तिऱ्हाईत मनुष्याला दिली आहे असें समजतें. ज्या मनुष्याला ती जागा मिळाली आहे तो ह्या परीक्षेलाही आला नव्हता. परंतु त्याला जागा कोणत्या परीक्षेच्या निकालावर मिळाली हें कांहींच कळत नाहीं.

साहेब बाहदुरानीं त्या मनुष्याची अगोदर परीक्षा घेतली असेल तर न कळे. अगोदरच सदरहु मनुष्याची परीक्षा घेतली असें मानिलेतर सदर्हू मनुष्या पेक्षां ज्यास्त हुशार मनुष्य पाहिजे होता किंवा सदर्हू मनुष्य अगदीं अयोग्य होते म्हणून इतर उमेदवार परीक्षे करितां बोलाविण्याचा व परीक्षेचा थाट करा करितां घातला. आपले खात्यांत अशी अशी व्यवस्था आहे व गुणाची व न्यायाची फार चाड आहे असा देखावा दाखविण्या करितां घतलीं कीं काय. झालेल्या निकाला वरून केवळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना व लोकांना देखावा दाखविण्याचा हा थाट होता असें दिसतें. असें जर साहेब बाहदुरानां करणें होतें तर गरीब बिचाऱ्या उमेदवारांना आशेला लावून कां बरें व्यर्थ खर्चांत व श्रमांत घातले आपला हा " पांन मुलुख अमारी " तर बोलून चालून आहेच तर मग रिकामा न्यायाचा देखावा दाखविण्याचे तरी आफिसर लोक कां बरें श्रम घेतात.

## पंडिता रमाबाईचें वऱ्हाडात आगमन

---

प्रसिद्ध पंडिता रमाबाई वरचेस गेल्या होत्या त्या गेले आठवड्यांत उमरावती येथें आल्या होत्या. त्यांचे उमरावतीकर मंडळींनीं आगत स्वागत त्यांचे योग्यतेनरुप चांगलें केलें असें कळतें त्यांची एकदोन व्याख्यानें झालीं परंतु तेवढ्या व्याख्यानानेंच सुद्धां लोकांची त्यांचे भाषण ऐकण्याची ईच्छा मुळींच तृप्ती झाली नाहीं. त्यांचे भाषणाचा एकसारखा ओघ एवढाच गुण त्यांचे बोलण्यांत असता तरी सुद्धां त्यांचें बोलणें फारच ऐकण्याजोगें असतें परंतु त्यांची भाषासरणी बोलण्याची शैली व एकंदरीनें मुद्देसुतपणा या गुणांनी परिपूर्ण भाषण ऐकून आमचे उमरावतीकर मंडळी खुष झाली यांत कांहीं नवल नाहीं. पंडिता रमाबाई यांनीं या प्रदेशांत यावें असें पुष्कळ दिवसापासून मंडळीचे मनांत होते परंतु तसा योग घडून आला नव्हता तो आता घडून आला पंडितबाई फार विद्वान आहेत व त्यांचे योग्यते प्रमाणें सर्वथैव जरी त्यांचा कदाचित बहुमान झाला नसेल तरी त्यांनीं आमची वऱ्हाडची आर्जवीभाकरी सादर केलेली त्यांनीं गोड करून घेतली पाहिजे त्यांचे जितकें रहाणें या प्रांतांत या खेपेस व्हावें असें वाटत होते तितकें झालें नाहीं व आमचे अकोल्यास येण्यास ही त्यांना सवड नव्हती असें कळतें तथापि पंडिताबाईंचे व्याख्यान अकोलेकर मंडळीचे कानीं पडण्याचा सुदीन लवकरच येईल अशी उमेद आहे कारण येत्या मार्च महिन्यांत शिमग्याचे सुमारास अकोल्यास जो वऱ्हाड हायस्कूल विद्यार्थी समाज होणार आहे त्या प्रसगांस त्यांनीं येण्याचे कबूल केलें आहे असें चांगल्या आधारा वरून आम्हास कळलें आहे व अर्थातच जरी विद्यार्थी समाज नियमित लोका करिता आहे तथापि समाज केवळ स्वार्थीकडे दृष्टि नदेतां पंडिता बाईचें व्याख्यानाची रसास्वाद इतर लोकांसही घेऊं देतील अशी आमची खातरी आहे.

उमरावतीस विश्रांती गृहाकडून ही त्यांस पानसुपारी झाली व त्या वेळीं कर्नल मेकेंझी जुडिशियल कमिशनर प्रांताचे कमिशनर ड्रऊडन साहेब, आवर्ड साहेब डेपुटी कमिशनर व इतर सभ्य युरोपियन गृहस्थ स्त्रिया व गांवांतील कांहीं कांहीं संभावित गृहस्थ आले होते पंडिता बाईनीं मुंबईस जी शाळा उच्च जातीच्या हिंदु विधवा करीतां काढली आहे ती बहुतेक लोकांना शारदासदन या नांवानें प्रसिद्ध आहेच या शाळेच्या प्रसंगी पंडिता रमाबाईचा थोडासा पूर्ववृतांत सांगितला असतां आमचे वाचकांस तो अप्रासंगिक आहे असें वाटणार नाहीं असें समजून आह्मी थोडक्यांत देतों.

पंडिता रमाबाई याचे वडील कोंकणस्थ ब्राह्मण हे मंगलूर कडचे राहणारे होते यांचे उपनांव डोंगरे. पुण्याचे प्रसिद्ध बाळशास्त्री मोटे हे याचे वडिलांचे मातूल होते त्यांचे वडिलांचा अभ्यास कांहीं दिवस पुण्यास झाला व त्यांचे गुरू कोणी रामचंद्र शास्त्री ह्मणून होते हे रामचंद्रपंत पेशव्याचे घराण्या पैकीं एका बाईस सरस्वतींत पुराणे वगैरे शिकविण्याचे कामीं होते व त्या बाईस संस्कृत चांगलें येतेसें पाहून त्यांचे मनावर असा कांहीं ग्रह झाला कीं संस्कृत भाषा केवळ नायकांकरितांच निर्माण झाली आहे व आपलें वतनाकडे विद्या करून परत गेल्यावर त्यांनीं आपले घरांतील बायकांस संस्कृत भाषा शिकविण्याचा प्रयत्न केला. व त्याप्रमाणें त्यांनीं आपले धाकटे बहिणीस संस्कृत शिकविलें त्या बाईचें नांव रमाबाई होते व तेंच नांव पुढें पंडिता बाईचे बापानें त्यांस ठेविले बायकांना विद्या शिकविणें विशेष करून वेदवि-

द्या अगर पौराणिक विद्या शिकविणें हे त्या वेळचे लोकांचे धर्मसंबंधीं ग्रहाचे अगदींविरुद्ध होते अर्थात बहिणीस संस्कृत शिकविण्याबद्दल त्यांना बराच त्रास सोसावा लागला लोकांनीं निर्भच्छना करून शेवटीं बहिष्कार घालण्याचा प्रसंग आणला श्रिंगेरीचे धर्म गुरू यांनीं त्यांस पाचारण केलें व धर्मविरुद्ध असली गोष्ठ तुह्मी करितां ह्मणून त्यास प्रपादले हे ग्रहस्थ बिद्वानच होते त्यांनीं सांगितलें कीं स्त्रिशिक्षणाचें विरुद्ध कोणता शास्त्राधार आहे हे मला सांगा व एक तरी निदान असा आधार काढून द्या ह्मणजे मी बहिष्कृत होईन. या धराला गोष्ट आल्यावर अर्थातच तो तंटा तितकाच मिटला. ( पुढें चालू )

The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 10, 1890.

## WHAT SHOULD BE THE AIM OF EDUCATED MEN.

Before determining what should be the aim of our education we must first mention the qualifications, habits, qualities and other advantages that are derived from education. Of course it is difficult to mention the above mentioned advantages in detail but the chief of them may be summed up in a few sentences. Education is nothing but a medicine to the diseased mind. It cures the mind of its distempers and makes it strong. It softens the heart and purifies the soul. Practically speaking education first drives away ignorance and with it our vicious tendencies. In the second stage of our education we begin to think for ourselves. Here then we find that we must be guided by duty which makes us free from vain temptations and which calms the weary strife of frail humanity. In a word man becomes dutiful and benevolence truthfulness justice find their abode in him. He further admires the skill and work of the Almighty and never fails to pay his respects to Him. The next change and perhaps the last that is produced in a man by education is that man tries to become perfect. He loves virtues and aims at becoming virtuous.

There are in short the advantages which a man gets by education and which are held laudable by the common sense of the 19th century.

Having stated these advantages of education we shall now fairly deal with the question 'What should be the aim of educated men." Now the above question is altogether blended with the question "What should be the aim of our actions" and cannot be separated from it. It is a very difficult task to find out the aim of man's action. Man's nature is not one throughout nor is his pursuit. All men are not actuated by one set of feelings nor are they placed in similar circumstances. Savages are carried away by their passions while hunters set their heart on killing deer. The object of some men is to hoard money while that of others is to get fame only. Some sacrifice themselves for the good of others while others try to satisfy themselves at all hazards. In this meledy of aims and pursuits we are to state which of them are approved and which of them are rejected. We shall apply these aims to the test of absolute morality and not to any religion or any relative standard. We cannot here discuss each and every aim and show its reasonableness or unreasonableness because to do so will require a separate kind of discussion and is beyond our present object. We can simply decide the question according to some well approved principle.

If we will read the history of all nations we will come to know that in each nation preference is given to our higher and spiritual qualities always rejecting our lower qualities. With each stage of civilization we find that our lower qualities are gradually despised. Illustrations are not wanting. Among savages we find that selfishness was the chief predominating vice. In the civilized times of Egypt there was that lack of chivalry and courtsy towards the weaker sex, which has become the character estic of modern times. In the heathen nations of Greece and Rome there is the absence of charity the essence of Christanity. The middle ages and the glorious times of the immemorable Charlemagne paid greater attention to military virtue and showed no amiable social qualities.

(To be continued.)

At the convocation of the University of Bombay for the conferring of degrees the Chancellor made a very short speech and the reason why he did so was that be had already delivered an account of his educational stewardship at Poona. After alluding to the University Bill he dwelt on the matter of examinations. He has suggested that to maintain in the examinations that continuity of standards which is so desirable, it may be deedmed advisable by the University to institute a board of studies to which all examination papers should be referred before they are issued to the students. Thereby the University shall attain that fixity of standards which is required in testing educational results and at the same time, where necessary that diversity which science forces upon our educational methods. We are at one with the chancellor and if the University will introduce this innovation it will do great good to our students. Every year we see new examiners in the University examinations and it is but natural that the nature of examination must fluctuate. A permanent board of experienced specialists and learned professors is necessary to guide these fresh examiners. We do not doubt the sincerity, honesty and learning of these fresh examiners but we insist on this board simply because it will serve as a light to these men.

## SUMMARY OF CONGRESS RESOLUTIONS.

Continued from our issue of 27th ultimo.

Resolution XI.

Resolved That the Subjects Committee be instructed to settle the questions, ( left open in the skeleton scheme for the reconstruction of the councils, embodied in resolution II ) of the qualifications requisite for and the disqualifications which should debar from becoming.

a a Voter.

b a Representative;

c a Member of the Imperial Legislative Council.

and to submit their Report there on to Charles Bradlaugh, Esq, M. P. for the purposes of the Bill which he has been requested to have drawn.

Resolution XII.

Resolved - That Mr. A. O. Hume C. B. be re-elected General Secretary of the National Indian Congress for the ensuing year.

Resolution. XIII

Resolved-

(a) That in view of the large number of the delegates this year assembled and the probability arising from past experience, of their number continuing to increase year by year, hence-forth the number of delegates to be allowed from each Congress circle be limited to five per million of the total population of the circle: Standing Committee of each circle allotting the number which their jurisdiction as a whole is entitled to elect, amongst their several eletorial divisions as may seem most expedient.

(b) That from the date of Mr. Hume's departure for England, the Honorable Pundit Ajoodhyanath be appointed Joint General Secretary, and that Rupees 5,000 be assigned for the payment by him of such Assistant Secretaries as he may find it necessary to employ, clerical assistance postage, telegraphs, and printing, and further that Mr. W. C. Bonnerjee be appointed Standing Counsel for Bengal, Mr. Pherozshah Mehta, Standing Counsel for Bombay and Mr. Ananda Charu Standing Counsel of madras, to the Joint General Secretary. (To be continued.)

## वऱ्हाड.

वऱ्हाडच्या उत्पन्नांतून खर्च वजा जातां राहिलेली बाकी १७३६९०२ रुपये सरकारानें निझाम सरकारांस दिली. मोठी मेहरबानीच झाली म्हणावयाची.

ज्या लोकांस रक्तपितीचा रोग जडला आहे त्या लोकांना कोणातही व्यापार करूं नये व एखाद्या मेळ्यांत जाऊं नये व कोणी गेल्यास त्यांस ५० रुपये दंड करण्याचे इलिचपूर मुनिसिपाल कमेटीनें ठरविलें आहे.

वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभेस तारीख २१ पासून उमरावतीस सुरुवात होईल.

ता० २ मिनहूस उमरावतीस एका बनीनांवाच्या कसाबिणीचा कोणी उपरण्यानें गळा कापून खून केल्याचें समजतें.

मि० गोविंदराजअया हे लवकरच ए अ कमिशनरचे जागीं कायम होतील असें ह्मणतात.

अनंत नारायण ना. तहशिलदार मुर्तिजापूर यांची वणीस बदली झाली.

मि० केशवराव जयकृष्ण ए. अ. क. यांची बरीच प्रकृति बिघडल्या मुळें त्यांनीं रजा घेतली आहे.

कर्नल रेनिक सा. कांहीं महिन्यांचे रजेवर जाणार आहेत असें ह्मणतात.

क्या. ड्रेन्सर यांचा राजिनामा मंजूर झाल्यामुळें मि. गॉडउईल ऑस्टेन यांची तेथून इलिचपूरास बदली झाली.

मि. हीथ साहेब डि. सु. पो. वाशिम हे रजेवर जाणार. त्यांच्या जागीं मि. व्हिक्राजा सा. अ. डि. सु. पो. अकोला ह्यांची नेमणूक होणार व त्यांचे जागीं मि. प्रीडाक्स सा. अ. डि. सु. पो. हे अकोल्यास येणार असें कळतें तसेंच मि. हेअर यास मि. ह्यूमन सेंव सुपरिंटेंडेंट ह्यांच्या जागी नेमून मि. सी. ए डब्ल्यु डेविस अ. क. ह्यांस अकोल्यास डे. क. नेमणार.

क्याप्. मारिस वाशिमचे डे. क. हे तीन महिन्यांची हक्काची रजा घेऊन जाणार त्या वेळी मि. यासिनखा ह्यांस त्यांच्या जागीं आफि. डे. क. नेमणार असें कळतें.

एक रुपया घेऊन दोन रुपये देणें हा धंदा बाळापूर ता. सुरु झाला म्हणून येथील फर्स्ट क्लास मा. मे. डेव्हिस साहेब यांणी कांहीं लोक पकडून आणले आहेत व एक दोन पोलीस कामगार ही सस्पेंड आहेत असें कळतें

वऱ्हाडांतील दि० कों कायद्याचे कलम ८ प्रमाणें मि. गोविंदराज, आफि. ए अ. क. यांचे कोर्ट फर्स्टक्लास अ. क. चें कोर्ट ठरलें आहे.

या सभेचे सेक्रेटरी रा. रा. गोविंद विश्वनाथ देशपांडे बाळापुरकर यांज कडेस.

वऱ्हाडांतील जमेदार लोकांच्या सभेस जमेदार लोकांकडून आजपर्यंत आलेली वर्गणी:—

रा. भगवंतराव व शंकरराव देशमुख दर्यापूर २५ रु० अनंदराव हरासिंग देशमुख बारसीटाकळी रु० २५ सदाशिव व यशवंतराव देशमुख यवद रु० २५ जयवंतराव सुंदर देशमुख तामसी १० रु०

| | | |
|---|---|---|
| जयराम हंबीरजी देशमुख | म्हैसपूर | ५ |
| छत्रपती बापुजी | " अकोले | ५ |
| सावजी व नारायणराव | " सेगांव | १० |
| दीपाराव | " उगवे | २ |
| आत्माराम | " वडाळी | २ |
| चिमणाजी | " उगव | ४ |
| मुकुंदराव नंदाजी | " मुंडगांव | २५ |
| रामराव सखाराम देशपांडे | नांदुर | १ |
| मुगुटराव | " उगवे | १० |
| रामचंद्र नानाजी | " नांदुरा | १ |
| गणेश नारायण | " दर्यापूर | १२ |
| नारायणराव दवलतराव | " लाखनवाड | १५ |
| वामन अनंदराव देशमुख | रामतीर्थ | १० |

लोकल बोर्डाच्या नियमांतील ९ व्या नियमांत खाली मसुदा दिला आहे त्याप्रमाणें अधिक घालावयाचे आहे; व तो मसुदा सर्वांस माहितीसाठीं लो० बोर्डाचे कायद्याचे कलम ३४ प्रमाणें प्रसिद्ध केला आहे.

ह्या मसुद्याचा विचार ता. १९ फेब्रुवारी १८९० रोजीं होईल.

अधिक घालावयाचें ह्याचा मसुदाः– "असे ठरविण्यांत येतें कीं, ह्या नियमा अन्वयें पहिली निवडणूक आक्टोबर १८९० मध्यें किंवा त्यानंतर रेसिडेंट सा० फरमावितील तितक्या लवकर होईल.

मि. गोविंदराज, आफि ए. अ. क. यास पहिल्यां वर्गाचे मजिस्ट्रेटचे अधिकार मिळाले.

मि. महमंद यासीन खां, आफि. अ. क. फर्स्ट क्लास यांची बुलढाण्याहून उमरावतीस बदली झाली.

खा० ब० सय्यद समसुद्दीन अली, आफ. अ. क. फर्स्ट क्लास, यांस सहा आठवड्याची हक्काची रजा मिळाली. त्यांचे जागी पंडित सुरज नारायण आफि. अ. क. सेकंड क्लास, यांस आफि. अ. क. फर्स्ट क्लास, नेमलें.

मि. बाळकृष्ण बळवंत सुळे अ० तहसिलदार, यांस तिसऱ्या वर्गाचे मजिस्ट्रेटचे आधिकार मिळाले.

मि. दुर्गय्या पिल्ले, आस्पितल असिस्टंट शिगांव डिस्पेंसरी, यांस ता० १९ जानेवारी १८९० किंवा ते घेतील त्या पुढील तारखे पासून तीन महिन्याची हक्काची रजा मिळाली, व ह्यांचे जागी शेकहुसेन आस्पि० असि० उमरावती यांस नेमलें.

आस्पि० असि० मि. विठ्ठल भाऊ, जळगांव डिस्पेंसरी यास तीनमहिन्यी हक्काची रजा १८९० ता० १९ जानेवारी पासुन किंवा ते घेतील त्या तारखेपासून मिळाली त्यांचे जागी आस्पि० असि. मीरसफर अली यांस नेमलें.

## वर्तमानसार.

मद्रास सरकारानें १८९०–९१ सालचें बजेट हिंदुस्थान सरकाराकडे पाठविलें आहे. या बजेटावरून ३८७ लाख रुपये उत्पन्न होऊन २९८ लाख रुपये.खर्च होईल असा अदमास काढला आहे.

मद्रास इलाख्यांतील कृष्णा प्रांतांत एक विलक्षण गोष्ट बाहेर आली आहे. कित्येक कामदारांच्या लबाडीमुळें या प्रांतांतील एका जमीनदाराच्या जमीनीस सरकार मार्फत पाणी मिळत असून तीवर अकारणी मुळींच नाहीं. या लबाडीनें सरकारचें दरवर्षास अर्धा लाख नुकसान होत आहे. या संबंधानें बारीक तपास जारीनें सुरूं आहे. पहावें काय होतें.

इराणच्या शहावर इंग्लंडचें वजन जास्त पडत चाललें व तो कदाचित रशियावर उलटेल अशी भीती वाटत आहे असें रशियन पत्रांचें ह्मणणें आहे.

तूं कुत्रा व भित्रा आहेस असें एकानें दुसऱ्यास भरसभेंत ह्मटल्यावरून तसें ह्मणणारास विलायतेस तीन महिने शिक्षा झाली आहे.

मुंबईचे डे० अकौंटंट जनरल मि. ब्रान्सन किंवा एका शिपायाशीं हाणामार करणारे यांस १८ महिने रजा दिली. बरी ब्याद गेली.

राणीचे नातू प्रिन्स आल्बर्ट व्हिक्टर याणी ब्रह्मदेशांत कांहीं अवर्णनीय प्रकार केला असें ह्मणतात. बिचाऱ्याचें लग्न झालें नसेल मग तरी काय करील!

हिंदुस्थानांतील खाणी संबंधानें नवे नियम करण्यासाठीं एक कमिशन बसणार आहे.

तिबेटच्या प्रांतांत एक इंग्रज हेर तिबेटी पोषाख करून हिंडत आहे. या प्रांतांत रशियाचे लोक आहेत असें याचें ह्मणणें आहे.

गेल्या वर्षी इजिप्तच्या खजिन्यांत १९,६०,००० रुपये शिलक होती. हिंदुस्थानची किती आहे!

हिंदुस्थानांतून विलायतेस जाणाऱ्या तारांचा दर कमी होणार आहे.

येत्या मनुष्य गणतीच्या वेळीं रक्तपित्तीच्या रोग्यांची विशेष बारीक रीतीनें गणती करण्यांत येणार आहे.

एका युरोपियनाचें प्रेत मुंबईच्या कोटांत एक रात्र रस्त्यावर उघडें पडलें होतें असें ह्मणतात. मोठेंच आश्चर्य! ! हिंदुचें पडलें तर विशेष आश्चर्य नाहीं.

इंग्लंडांत सैन्य योग्य रीतीनें शिकविलेलें नाहीं. व त्यावरील मुख्य अधिकारी माकडाप्रमाणें दिसतात असें लार्ड वुइल्सन यांणीं एक ठिकाणीं बोलून दाखविलें. आमच्या इकडे असें ह्मणण्याची कोणाची पुण्याई आहे काय! लागलीच आंदमान बेटावर त्याची रवानगी.

मनोतीच्या दरांत नेहमीं गोंधळ होत असल्यामुळें तो दर हिंदुस्थान सरकारानें कायम केला आहे. एक शिलिंग ९ पेन्स ह्मणजे एक रुपया असा दर आहे. हा दर १८९० पासून अमलांत येईल. याच दरानें विलायतेतील पेन्शनरांस पगार देण्यांत येईल.

एक युरोपियन कंपनीनें ६० लाखचें दिवाळें काढलें आहे.

राष्ट्रीय सभेसाठीं आलेले मि. ब्राडला विलायतेस सुखरूप पोहोचले

सन १७५६ त सुराजउद्दवल्यानें कलकत्याच्या ज्या किल्यांत इंग्लिश लोकांस कैद केलें होतें त्या किल्यांतील कांहीं जुन्यावस्तु नुकत्यांच सांपडल्या आहेत. कलकत्यास एका खाणींत कित्येक मजूर काम करीत असतां एकाएकी ते सर्व लोक सुमारें १०-९ फूट खालीं गेले व तेथें त्यांच्या पायास एक तोफ लागली व याच्याच सभोंवार सुमारें १०० गोळे सापडले आहेत याच बादशहानें कलकत्यास जो एक ' ब्लाक होल ' नावाचा प्रयोग केला त्यापासून निसटून जाते वेळीं त्या वेळच्या गव्हरनरानें ती तोफ तेथें ठेवली असावी असें ह्मणतात. याच तोफेजवळ स्वच्छ चुन्याचा उत्तम रीतीनें संरक्षण केलेला ढीगही सांपडला आहे. ठा० अ०

महाराणी व्हिक्टोरिया येत्या मार्चच्या अखेरीस फ्रांसमध्यें जाणार आहेत असें समजतें.

हैदराबाद, चदरघाट, शिकंदराबाद व बोलारम येथील ५२ शाळांतील पांच हजार मुलांचा मेळा ता० ३० रोजीं जमला होता त्यावेळेस रेसिडेंट व दिवाण साहेब हे मौज पाहण्यास हजर होते. निझाम शाहींत ही विद्येचा प्रसार व्हावयास लागला ही समाधानीची गोष्ट आहे.

सालरजंग यांच्या घराण्याची मालमत्ता व जहागिरी सालरजंग यांचा मुलगा व नबाब मुनीरउलमुल्क यांची मुलगी या सर्वांची व्यवस्था सरकारमार्फत होऊन त्याजवर देखरेख सरकारची राहील असें ह्मणतात.

हिंदुस्थान सरकारची सर्व देशभर सारखीं वजनें असावीं असा विचार आहे. व त्याजबद्दल त्यांणीं इतर सर्व सरकारचे अभिप्राय मागविले आहेत. रुपयाभार तोळा समजावा ८० तोळ्याचा एक शेर व चाळीस शेराचा एक मण या प्रमाणें सर्व वजनें असावीत. सर्व रेल्वेवर याप्रमाणें वजनाचा शिरस्ता आहे तेव्हां तसाच प्रचार सर्वत्र व्यवहारांत असावा असा सरकारचा इरादा आहे. सु० प०

गिलजीट येथें २६०० काश्मीरी लष्कर ठेवावें अशी सूचना तेथील पोलिटिकल एजंट क्यापटन डयुरांड यांणीं हिंदुस्थान सरकारास केली होती ती सरकारानें मान्य केली.

आलीव्ह झाडाची लागवड— ' आलीव्ह आईल ' ह्मणून एक फार किंमतीचें तेल असते त्याचा युरोपांत खाण्याकडे फार उपयोग होतो. ह्या आलीव्ह झाडाची पुष्कळ कलमें रोमच्या शेतकी खात्याकडून हिंदुस्थान सरकारानें आणविलीं आहेत. त्यांची लागण रावलपिंडी येथें करण्याचा सरकारचा विचार आहे. हा यत्न सुफळ झाला असतां लोकांच्या जीवनाचा हा एक मोठाच धंदा निघण्याचा पुष्कळ संभव आहे.

विचार—हिंदुस्थानांत लहान सांचाच्या आगगाड्या आहेत त्या मोठ्या सांचाच्या करण्यासाठीं २०० लक्ष पौंड खर्च करावे असा विचार इंडिया कौन्सिलांत घाटत आहे असें एक बातमीदार कळवितो.

ब्राडला यांस मिळकत— बोस्टन ( अमेरिका ) येथील पोर्टलंड नांवाच्या मनुष्यानें १००० पौंड व दोघां निरिश्वरवादी बायांनीं २०० व १०० पौंड ब्राडला यांस द्यावे असें मृत्युपत्रांत लिहून ठेवलें आहे.

बंगाल्यांतल्या कालेजांत नोकरीवर ठेवण्यासाठीं दोन युरोपियन प्रोफेसर बंगाल सरकारानें मागविले होते. पांच वर्षे नोकरींत ठेवावयाचे या करारानें स्टेट सेक्रेटरीनीं दरमहा ८०० रुपये देण्याच्या करारानें दोन प्रोफेसर विलायतेहून रवाना केले आहेत.

आगमन—ब्रह्मदेशांतील माणकांच्या खाणीची तपासणी करण्याकरितां कंपनीच्या तर्फे सरलिंपल ग्रिफिन साहेब हिंदुस्थानांत आले आहेत.

नवनीत मयखनिज तेल— राकेला प्रमाणें हें एक नवेंच तेल सांपडलें आहे याचा रंग लोण्या सारखा असून त्यांत क्षार नाहीं. राकेलाप्रमाणें हें भडका घेत नाहीं. ह्मणण्यासारखा वास यांस नसतो. त्यांत राळेचा घटकावयव नसतो. ह्याच्या योगानें धातूवर कांहीं परिणाम घडत नाहीं. शु. सु

फेरफार " इकडे माझा भाऊ रुपये मोजितो, रुपये मोजितो. इकडे माझी बहीण सुपल्या खेळते, सुपल्या खेळते, " असें जें गाणें मुली ह्मणत असतात, त्यांत " भामिनी प्रकाश ' कर्त्यांनें पुढें लिहिलेला फेरफार केला आहे " इकडे माझे भाऊ गटारीं लोळतात, गटारीं लोळतात! इकडे माझ्या बहिणी चटया हंतरतात, चटया हंतरतात! सुधारलेल्या मद्यपी विद्वानांनीं हें पाहून तरी तुह्मांस कांहीं लाज वाटेल काय?

वाघाची व माणसाची लढाई— सांगली करांच्या शहापूर तालुक्यांपैकीं केदनूर गांवीं गेल्या आटवड्यांत एक वाघ माणसांचे रक्तपिप्यास सवकला होता. त्यानें पुष्कळ मनुष्यास जाया केलें गेल्याच्या मागील गुरुवारीं हा वाघ एका कुरणांत शिरला. त्यावेळीं तेथील शेतकऱ्यानें आपल्या विळ्यानें त्यास ठार केलें. सुमारें तास भर या दोघांची मोठी बनचकी झाली. आसपास पुष्कळ मंडळी होती. पण कोणाची छाती होईना. वाघ मेला, पण शेतकरी फार घायाळ झाला आहे सु० सि०

मुंबईस एका इसमानें आपल्या दुभत्या गाईस बांध्याची लिद चारली त्यावरुन त्यास २० रुपये दंड झाला.

आर्किपेलेगो बेटांतील बाली बेटांत राहणाऱ्या लोकांत सती जाण्याची चाल आहे. एखादा गृहस्त घरचा श्रीमंत किंवा अधिकारी असला, तर त्याचे गुलामसही त्याचे प्रेताबरोबर जाळण्यांत येतात बायकांनीं सती जाण्याचें नाकारिलें तर त्यांच्या घरांतील माणसें त्यांस बरचीनें भोंसकून मारितात.

हिंदुस्थानच्या येत्या प्रजा मणतीचा दिवस ता. २६ फेब्रुवारी १८९१ हा नेमण्यांत येईल.

प्रसिद्ध क्रॉफर्ड साहेब यांस लाच लुचपतीचे कारणानें चाकरी सोडणें भाग पडलें म्हणून त्यांच्या कुटुंबास दरसाल ३००० रु. व मुलांस ७०० रु. पेनशन देण्याचा ठराव सरकारानें कल्याचें कळतें. हाच नियम क्राफर्ड प्रकरणांत काढलेल्या कामगारांच्या बायकापोरास कां लागु करूंनये! जो पर्यंत तसें होणार नाहीं तोपर्यंत ही देणगी योग्य म्हणता येणार नाहीं.

राजपुत्र व्हिक्टर नेपाळच्या बेगम साहेबांचे दिवाणाची भेट घेण्यासाठीं सरहद्दीवर जाणार.

## जाहीरात.

आह्मी अकोले येथील कोर्टांत वकीली करण्याचें सुरू केलें आहे. पक्षकारांचीं कामें माफक फी घेऊन काळजीनें करीत जाऊं. फिर्यादी व अपिलें इंग्रजींत व मराठींत लिहून देत जाऊं व सवडी प्रमाणें बाहेर गांवीं हीं कामें घेत जाऊं.

आमचें आफीस पेठेंत टाऊनहालाचे नजीक बाळकृष्ण अण्णाच्या वाड्यांत आहे.

ता० १६ जानेवारी १८९० } श्रीकृष्ण चिमणाजी देशपांडे वकील.

नोटीस.

गणपती वल्लद अंबु पाटील राहणार सोनाळें मगलचंद जगदेव मारवाडी दुकान सोनाळें. वामण लक्ष्मण देशपांडे. चुनीलाल लक्ष्मणदास मारवाडी. हेडमास्तर मराठी शाळा सोनाळें. यांस नारायणदास रेवादास अगरवाले राहाणार सोनाळें याजकडून नोटीस देण्यांत येते कीं गणपत नरायण या नावानें देण्या घेण्याची दुकान कर्जेव सोनाळें तालुके जळगांव येथें सुरूं होऊन सुमारें ७।८ वर्षे झाली आहेत त्या दुकानचा हीशोब देण्या संबंधी तुह्मास ह्मणजे गणपती वल्लद अंबु पाटील यांस तारीख २८ माहे दिसेंबर सन १८८९ रोजी नोटीस वर्तमानपत्र द्वारे दीली असोन नोटीसी प्रमाणें तुह्मी हीशोब दाखऊन नीकाल नफ्या तोट्याचा केला नाहीं व दुकान चालविली आहे दुकानचें कर्ज हा कांहीं लोकाचे मुदती बहेर तुह्मी मागणें न केल्या मुळें गेलें आहे. या साठीं तुह्मांस या नोटीशीनें असें सुचवितों कीं दुकानच्या वह्या तुह्मी आह्मांस दाखवाव्या असें तुह्मांस वरंवार सागत गेलोंव या संबंधानें गावांतील चार लोकांस ही मध्यस्थी घालून उभयतानीं वाली हीलेले गृहस्थांस पंच नेमुन करार लिहून दीले पण तुह्मी त्या पंचा पैकीं मंगलचंद स फीतऊन वह्याच्या संबंधानें जे पाहण्याचें ते न पाहतां एक तर्फी फैसल करण्याचा वीचार दिसतो सबब मी पंचाईत करण्यास राजी नाहीं. मी दीलेला करारनामा रद्द करावा असें तुह्मांस वारंवार सांगत असोन वह्या पाहण्यांस मी आपला मणुष्य आणला असतां त्यांस ही तुह्मी वह्या दाखविल्या नाहींत या मुळें पंचास करारनामा दीलेला रद्द आहे. असें तुह्मी व पंचानी समजून दाव्याचे काम बीलकुल चालुं नयें मी दुकान शराकतीत आहे या संबधानें शराकतीचा हीशोब दाखविल्या बद्दल दीवानी कोर्टांत फीर्याद दाखल करणार आहे या करितां तुह्मी नोटीस पावल्यावर सर्व काम वंद ठेवावें म्हणजे दुकानचे घेणें देणें सुरू ठेऊन भोकरदम्या साठीं पंच बसून पंचाईत करण्याची जरूरी एक तर्फ तुम्हीं काम करित असल्या मुळें नाहीं

तारीख ३ माहे फेब्रुवारी सन १८९० ई.

सही

नारायणदास रेवादास अगरवाले राहणार सोनाळें तालुके जळगांव दस्तुर खु.

हें पत्र अकोला येथें कै. वासुदेव खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०१३
सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास........................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु०१
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

Rs.
per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..................................4as

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10...4 aa
Repetition per line3a


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXIV AKOLA MONDAY 17 FEBRUARY 1890 NO 7

वर्ष २४ अकोला सोमवार तारीख १७ माहे फेब्रुवारी सन १८९० इ० अंक ७


## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असे समजूं नये.

नामोद तारीख ९-२ ९०

अलीकडे इंग्रजी राज्य सुरू झाल्या पासून देशाच्या भरभराटीस प्रदर्शनें आणि प्रसिद्ध देवाच्या ठिकाणीं जत्रा भरणें ह्या गोष्टी बऱ्याच आवेशानें कारणभूत होत आहेत. हें सर्वांच्या अनुभवास येतच आहे. जत्रा भरणें यांत स्वार्थ आणि परमार्थ दोन्ही साध्य होतात. हा विचार मनांत आणून येथील सन्मान्य पुढारी मंडळींनीं येथील श्री नारायणेश्वराची जत्रा येत्या महा शिवरात्रीचे दिवशीं भरविण्याचा नियम ठरविला आहे. उद्देश वर दर्शविलाच आहे. त्यास दंऊरगांव भिलटेक बाशीम कौंडण्यपुर, इत्यादी ठिकाणीं ज्या प्रमाणें यात्रा भरून भक्त जनांस दर्शन व नामसंकीर्तनाचा लाभ घडत आहे. अशा ठिकाणीं व्यापारी लोकांचा व्यापार थोड्या अवकाशांत चांगला होतो. हे देशोन्नतीचे सुचिन्ह आहे करितां ही गोष्ट मनावर घेऊन सर्वांनीं अशा कामावर लक्ष पुरविणें अवश्य आहे. करितां महा शिवरात्रीचे दिवशीं येथें जत्रा भरविण्याचा नियम ठरलाच आहे. त्या प्रसंगास दुकानदार व शिवभक्त जन या मेळ्यास येतील ही आशा आहे येथें पाण्याची व जागेची सोय चांगली आहे.

आपला
नारायण विठल अ.
मा. नामोद

वऱ्हाडसमाचार.

मिती माघ वद्य १३ शके १८११

## संप व तत्संबंधी विचार.

( डिसेंबर १८८९ च्या ४८ व्या अंकावरून पुढें चालूं )

या प्रमाणें Trades Unions जेव्हां सुरू झाल्या तेव्हांच मात्र " संप " पुष्कळ होऊं लागले व त्यांचा परिणाम ही मजूर लोकांस हितावह वाटूं लागला. परंतु कोणतीही कल्पना नवीन सुरू झाली म्हणजे त्यामध्यें कांहींना कांहीं तरी दोष असतो त्या प्रमाणें या Trades Union मध्यें ही प्रथमतः कांहीं दोष होते. मुख्य दोष असा होता कीं लोकांस Unions चे मेंबर बलात्कारानें करीत असत. म्हणजे समजा कीं जर एखाद्या गांवांतील कांहीं गवंडी लोकांनीं संप केला आणि जर त्यांत इतर गवंडी आले नाहींत तर ह्या लोकांचे मेंबर गवंडी हरएक प्रकारें नुकसान करीत. त्यांस जर एखाद्यानें कामावर नेलें तर मेंबर लोक तिकडे जाऊन हा मजूर कांहीं कामाचा नाहीं हा लबाड आहे वगैरे त्याची निंदा करूं लागते. अशा प्रकारचा दोष कांहीं लहान नाहीं आणि हा दोष ही कल्पना जेव्हां नुकतीच निघाली तेव्हांच तिच्यांत दिसूं लागला मग काय विचारावयाचें! अगोदरच मजूर लोक, ( कीं त्यांचा ह्या जगांत वाली म्हणून कोणीच नाहीं. ) त्यांत Trades Union ही त्यांची संस्था आणि तिच्यांत हा घातुक दोष व्यापारी लोक या लोकांवर टपलेलेच. त्यांनीं सरकारांत अर्ज केले कीं Trades Union हे फार घातुक आहेत म्हणून अशा प्रकारच्या सभा सरकारानें बंद कराव्यात. इंग्लिश पार्लमेंटानें या कामांत हात घातला व असा ठराव करण्यांत आला कीं Trades Union ही सभा मजूर लोकांनीं आपल्या स्वार्थी करितां स्थापित केली आहे. व जो पर्यंत ते आपण होऊन स्वार्थी करितां दुसऱ्याचें नुकसान करीत नाहीं किंवा त्यावर बलात्कार करीत नाहीं तो पर्यंत कायद्यानें त्यांचा स्वार्थ कबूल करावा व इतःपर Trades Union चे मेंबर होण्या बद्दल कोणावर ही बलात्कार करूं नये. असो, या प्रमाणें Trades Union मधला दोष तर निघून गेला व त्यांचें प्राबल्य दिवसें दिवस वाढूं लागलें आणि तें पुढें आलेल्या महत्वाचा दुरुपयोग करूं लागले म्हणजे ते आतां भलत्याच वेळीं संप करून जास्त राजमुरा मागूं लागले. ह्या वेळेस विचारी मनुष्यास स्थिती अगदीं निराळी दिसून येईल. Trades Union होण्या पूर्वीं व्यापारी लोकांचे मजूर लोकांवर प्राबल्य असे. आतां तेच व्यापारी लोक मजूर लोकांच्या ताब्यांत गेले. मजूर लोक आपली स्थिती कशी सुधारावी म्हणून त्या वेळेस उपाय शोधावयास लागले आतां व्यापारी लोक त्या विवंचनेंत पडले. मजूर लोकांनीं त्यावेळेस संप सुरू केले आतां व्यापारी लोकांनीं Lock outs सुरू केले. Lock out म्हणजे व्यापारी लोकांचा संप ज्या वेळेस मजूर लोक संप करितात त्या वेळेस हेही लोक संप करितात म्हणजे ह्या वेळेस व्यापारी लोक मजूर लोकांच्या अटी कबूल न करितां दुसरी कडून आपलें काम करून आणितात याचें दिग्दर्शन आम्ही वरच एका उदाहरणांत केलें आहे. या प्रमाणें जेव्हां दोन्ही पक्षांत संप दिसूं लागले तेव्हां कशी तरी वाट लागावी म्हणून पुढें courts of Arbitration स्थापित झालीं त्या मध्यें दोन्ही पक्षांची आपसांत समजूत होऊन दोघही ताळ्यावर येऊं लागले

या प्रमाणें युरोपांत संप कसे सुरू झाले आहेत व त्यांची अमलबजावणी होण्यास कायकाय दुसरीं साधनें करावीं लागलीं आणि पुढें व्यापारी लोकांनीं काय काय तजविजी केल्या याची माहिती थोडक्यांत झाली. पण युरोपांतील लोक येथवरच येऊन थांबले नाहींत. त्यांस संपा पासून होणाऱ्या दगदगी सोसेनात एकदा Strikes झाले कीं करारे Lock-outs; बसवारे Court of Arbitration; आणि मग! होऊं द्या Compromise. इतकें सारें होते आहे तों व्यापाराचा सगळा हंगाम निघून जातो आहे. या अडचणी त्यांस पाहवेनात. विद्येच्या प्रभावानें व्यापारी व मजूर या दोघांसही असें करण्यांत आपलें नुकसान आहे असें दिसून येऊं लागलें. तेव्हां ज्या व्यापारांत संप करतां येईल त्या व्यापारांतच ते करूं लागले बाकीच्या व्यापारांत त्यांनीं Cooperation वगैरे दुसऱ्या दुसऱ्या संस्था स्थापित केल्या. त्यांचा strikes शीं कांहीं एक संबंध नाहीं म्हणून आम्ही त्याबद्दल येथें कांहींएक लिहीत नाहीं पण इतकेंच येथें सांगतो कीं युरोपांत जमेल अशा व्यापारांत आणि जमेल अशा वेळींच संप करितात आणि जेव्हां नुकसानाची बाब असेल तेव्हां strikes चा उपयोग न करितां दुसऱ्या संस्थे कडे लक्ष्य देतात. एवढ्या साठींच इतर प्रकारच्या संस्था आहेत असें वर दिग्दर्शन केलें.

ही जी वर संपा संबंधीं हकिकत दिली ती पासून हिंदुस्थानांतील लोकांनीं ( व त्यांत आपल्या वऱ्हाडी लोकांनीं ) काय काय फायदा करून घ्यावा याचा आम्ही थोडक्यांत विचार करितों.

आपल्या लोकां मध्यें व्यापार हा फारच निकृष्ट स्थितींत आहे याचें मुख्य कारण मुद्दलांची कमतरता हें आहे; लोकांचे अंगीं पैसा खर्च करण्याचें धाडस आलें नाहीं. तें आतां जास्त जास्त येत चाललें आहे परंतु अद्याप पर्यंत मुद्दल कमी आहे तेणेंकरून मजूर लोकांची स्थिती फारच वाईट राहिली आहे. पहा इकडील कष्ट करणारे लोकांस पुरे तीन आणे देखील मिळत नाहींत म्हणजे एका मनुष्याच्या पोटा पुरते देखील पैसे पडत नाहींत मग ऐषआराम कोठला! अशा बिचाऱ्या मजुरास एक बायको चार पांच लहान मुलें त्याची आई एखादा लहान भाऊ असतोच. यांच्या पोटा पुरतें अन्न त्यास मिळत नाहीं. अशी मजुरांची स्थिती असल्या मुळें कायिक व मानसिक शक्ति फार कमी आढळून येते. देशाच्या संपत्तीचे मजूर हे कारणभूत असल्यामुळें आपल्या देशांत संपत्ती फारच कमी उत्पन्न होते. तेव्हां मजूर लोकांच्या स्थिती कडे सर्वांनीं अवश्य लक्ष्य द्यावें. त्यांची स्थिती सुधारावी म्हणजे त्यांनीं आपण स्वतः होऊन स्वार्थाकडे लक्ष्य द्यावयास लागणें हें होय आणि हें तत्व संप, Cooperation वगैरे संस्थेंत दिसून येत आहे परंतु Trades union किंवा Cooperation स्थापन करण्याची योग्यता मजूर लोकांच्या अंगीं अद्याप आली नाहीं. कोणत्याही एखाद्या संस्थेचा मेंबर होण्यास मनुष्याच्या अंगांत उतावीळपणा मुळींच नसला पाहिजे. धीरता, विश्वासूपणा, प्रामाणिकपणा वगैरे गूण अवश्य असले पाहिजेत. तशीच अज्ञाधारकताही असली पाहिजे. ही गोष्ट उदाहरणानें बरीच व्यक्त होईल. पहा, आज जर अकोल्यास एखाद्या मजुरांची सभा स्थापित केली तर आम्हांस असें खात्रीनें सांगतां येतें कीं ती सभा फारच थोडे दिवस चालेल. सभेच्या फंडास मजूर लोक मुळींच पैसा देणार नाहींत. कारण आपण मेल्यावर आपल्या कुटुंबास या फंडांतील कांहीं पैसा मिळेल असा दूरदर्शीपणा विश्वासूपणा व धीरता फारच थोडक्यांच्या अंगीं सांपडेल. हें गुण त्यांच्या आंगांत केवळ विद्येनेंच येतील तेव्हां आपण सर्व लोकांनीं मजूर लोकांस जितकी विद्या देववेल तितकी देण्या विषयीं यत्न करावा. एकत्र होऊन खाण्या पिण्याची तजवीज न पहातां मजूर लोक अविचारीपणानें लग्न लावितात तें बंद केल्यास त्यांची स्थिती सुधारेल हा मुद्दा सप्रमाण सिद्ध आहे व याकडेस आपलें लक्ष्य गेलें पाहिजे.

आतां जर मजूर लोक संप करण्यास तयार करावयाचे असतील तर वर सांगितलेल्या मुद्याचा आमच्या लोकांनीं पूर्ण विचार करावा.

## पंडिता रमाबाईचें वऱ्हाडात आगमन

( मागील अंकावरून पुढें चालूं. )

—स्त्रीशिक्षणाचें विरुद्ध शास्त्राधार त्यांस कांहीं दाखवितां आला नाहीं व यांनींही आपला संस्कृत शिकविण्याचा क्रम सुरू ठेवला. कर्मधर्मसंयोग त्यांची वहीण सुमारें बारा तेरा वर्षांची होऊन वारली त्या मुळें त्यांस फारच दुःख झालें. एखाद्याचे तोंडचा घास काढून न्यावा असें त्यांस वाटलें. लोकमतांशीं विरुद्ध वागल्यानें त्यांना सारखा त्रास होतच होता. तेव्हां स्वारी त्रासून द्वारकेचे यात्रेस निघाली. त्या वेळेस द्वारकेचे यात्रा सोपी नव्हती यात्रा पायांनीं करावयाची व आता सारखा भूदिशी आगगाडीनें प्रवास होत नव्हता बाईचे अभ्यंकर उपनांवाचे गृहस्थ यांस वाटेत भेटले उभयतांची भेट झाली. खुशाल प्रश्न झाल्यावर अभ्यंकर यांणीं कोंकणस्थ ब्राह्मण विद्वान पाहून आपली मुलगी देण्याचे एकदम कबूल केलें. काय योग घडून आला पहा! याच बाई पंडिता बाईच्या मातुश्री अर्थातच लग्न झाल्यावर पंडिताबाईचे वडील द्वारकेची यात्रा सोडून परत मावारे बायकोस घेऊन चालले. व अभ्यंकर हे काशी यात्रेस निघून गेले. परत आल्या नंतर त्यांनीं असा विचार केला

कीं लोकांशीं होईल तितका संबंध तोडून टाकावयाचा व आपले बायकोस ही विद्या म्हणजे संस्कृत विद्या शिकवावयाची म्हणून त्यांनीं तुंगभद्रेच्या कांठीं शांत जागा पाहून पर्णकुटिका करून तेथें राहण्याचा निश्चय केला. एक लहानसा मांडव घालून त्याचें घर केलें व त्या ठिकाणीं आपण व बायको व तिची धाकटी बहीण वगैरे निवडक माणसें राहूं लागलीं. जंगल म्हणजे अगदीं फिरे माणसांची वस्ती नाहीं जवळ नदीतटाक भोंवताली व्याघ्र वगैरे श्वापदें अशा निर्जन प्रदेशांत हे गृहस्थ लोकमतास त्रासून जाऊन राहिले व त्यांनीं आपले कुटुंबास विद्यादान हीं दिले व त्याच ठिकाणीं त्यांस तीन आपत्यें हीं झालीं. एक मुलगा व दोन मुली व त्यास पैंस ही त्यांच मातुश्रीनें विद्या देण्याचा क्रम आरंभिला. कांहीं दिवसांनीं त्या ठिकाणीं तसल्या रानांत देखील सोयरेधायरे जमले व जेवणारांची गरदी झालीच त्यामुळें पुढें वतनवाडी सर्व जिकडच्या तिकडे होऊन सर्व कुटुंबांस तीर्थयात्रा करण्याचा प्रसंग आला. यात्रा करीत करीत मंडळी काशीस राहिली. तेथें पंडिता बाईचे वडील यांनीं अद्वैतमत सोडून द्वैत मताचे वैष्णवी ग्रंथाचा अभ्यास केला व पुढें गयेस गेले. त्या ठिकाणीं त्यांना दुःख होण्याचा एक प्रसंग आला. पंडिताबाईची वडील बहीण होती म्हणून वर सांगितलेच आहे तिचा विवाह लहानपणीं केला होता. व पंडिताबाईचे वडिलांचा असा हेतु होता कीं घरजावई करून त्यास उत्तम विद्या शिकवून विद्वान करावयाचे मुलगा गरिबाचा पाहून त्याचे आईबापाशीं करार केला कीं मुलगा विद्याभ्यासास आमचे घरीं राहिला पाहिजे. करार चोख झाला तरी मुलाचे आईबापांनीं विवाहा नंतर त्यांस घेऊन जाऊन लपऊन ठेवला व त्यास विद्येशिवाय राहू दिलें व ही स्वारी पक्की लठ्ठ निरंजन बनली. याची व याचे बायकोची कित्येक वर्षें भेट मुळींच नव्हती; ही स्वारी गयेस येऊन धडकली व आपले सासऱ्यास म्हणूं लागले कीं बायको आमचे बरोबर पाठवा. छत्रामध्यें जेवण, पैसा मिळविण्याची अक्कल नाहीं व बायकोस बरोबर चालण्यास सांगणार तेव्हां त्या बायकोचे व त्यांचे जमावें कसें. अर्थातच तीनें येण्याचे नाकारलें. कोठें कोठें इष्ट मंडळी ठिकठिकाणीं असतेच त्यांनी बोवास मदत करून बाईवर फिर्याद करविली व त्याजवर नवऱ्या बरोबर गेले पाहिजे असा हुकुमनामा झाला परंतु पुढें पैसा नसल्यामुळें बोवांस प्रकर्ण पुढें चालवितां आलें नाहीं व बाई आपले वडिलापाशीं राहिल्या. या मुळें रमाबाईचे लग्न लवकर करूनये असा त्याचे वडीलानीं निश्चय केला व पुन्हा घरजांवई करण्याचा नाद सोडून दिला. नंतर गयेतून परत निघाले तेव्हां वाटखर्ची संपली. कोणी कोणत्या मिषानें कोणी कोणत्या मिषानें या भोळ्या गृहस्थास फसवून रुपये घेतले वाटेंत यांचे विद्येमुळें जे पैसे मिळत ते खर्ची होत. जेमतेम कांहीं दिवस असेंच चाललें. होता होता ही मंडळी अकींचन होऊन गिरीचे व्यंकोबा पाशीं परत येऊन तेथें कांहीं दिवस राहिली. या वेळीं [illegible] बाईचे वडील डोळ्यास कांहीं उपच[illegible]लेल्या मुळें अंध झालें होते त्यांची मातुश्री ही नेहमीं दुखणाइतच असे नेहमीं ताप येतच असे. असें असतानांहीं असलें कष्ट व विपत्ती भोगून आपल्या मुलांचे विद्याभ्यासा करिता तिची निरंतर खटपट कर्मा झाली नाहीं शेवटीं उपास पडण्याचा प्रसंग आला तेव्हां गिरीस व्यंकोबा सोडून ही मंडळीं निघाला. काय करावें हें सुचना थोडकेंच दिवसांत पंडिता बाईचे वडीलास देवाज्ञा झाली त्यांच्या मातुश्री ही त्यानंतर दोनतीन महिन्यांनीं वारल्या नंतर त्रो वर्षे राहिली त्या पैकीं त्यांची बहीण सुमारें एक वर्षानंतर वारली मग ही बहिण भावंडेच कायती शाळक राहिली उभयता पैकी व्यवहार शून्य. जन्म सारा पौराणिक विद्येंत घालविलेला श्रम करण्याचे ठाऊक नाहीं. भिक सुद्धां मागण्याचें ठाऊक नाहीं. देवावर पूर्ण भरंवसा व तें उपोषणें करून देव दर्शन व प्रत्यक्ष साक्षात्कार होईल अशा पैकी खातरी. अशा स्थितींत यांचे बंधुनीं कित्येक दिवस उपास करवित बाईनी ही करावे शेवटीं खावयाला मिळेना म्हणुन जंगलांत दोघेजण गेले. तेथे शिंदीचे फळें व उदक यांवर निर्वाह! ज्यांनी पंडिता रमाबाइची हालींची स्थीति पाहिली आहे त्यांस त्यांनीं अशी घोर दुःखें भोगिल्याचे मनांत तरी येईल काय! त्यांचे बंधूच तशांत पटकीचा बाखा झाला पण त्यांतुन तो कसा तरी निभावला असो नंतर तेथून दोघेजण पुन्हा यात्रेस निघाली ती पंजाबांत गेली लाहोरचे युनिव्हर्सिटीत रजिष्ट्रार डाकटर लिटनर म्हणून होते त्यांनीं याचे भावास आश्रय दिला होता व दोघेजण थोडा थोडा अभ्यास करित होता. पुढें यांचे त्याचे बनेना त्यांनीं यांचा पगार ३ महिने बंद केला व यांस घर्ण भिजऊन खाण्याचा प्रसंग आला. अशा उपवासांत दिवस काढण्याचा कंटाळा येऊन दोघे जण बंगाल्यांत गेली तेथें त्याचे बंधु ही मरण पावले. त्यां नंतर त्यांचे बंगाल्यांतील एका गृहस्थांशी विवाह झाला. हे गृहस्थ कांहीं दिवसांनीं मरण पावले. नंतर पंडिता बाईनीं विलायतेस जाऊन इंग्रजिचा अभ्यास केला व अमेरिकेंत जाऊनही कांहीं दिवस राहिल्या. अमेरिकेंतील त्यांचे दिर्घोद्योगास कांहीं पार नाहीं. त्यांनीं कित्येक मंडळ्या स्थापन केल्या व हिंदुस्थानांत बालविधवांची स्थिति काय आहे या बद्दल त्यांचे मनावर असा कांहीं ठसा उमटवून दिला कीं तेथील लोकांनीं यांस मदत देण्याचे ठरवून दरसाल सुमारें विस हजार रुपये देण्याचे अभिवचन दिलें आहे नंतर मुंबईस परत येऊन बाईनीं शारदासदन स्थापन केलें. हिंदुस्थानांतील स्त्रिया करितां अमेरिकेंतील लोकांनी वर्गणी करून शाळा स्थापन करावी हे आमचे लोकांस लज्जा नाहीं काय! असल्या कृत्यास देशांतले देशांत योग्य मदत कां मिळूं नये!

या संबंधानें कांहीं तरी चळवळ होणें अगदीं जरूर आहे व आमची अशी पूर्ण उमेद आहे कीं थोडकेच दिवसात वऱ्हाडात व इतर ठिकाणींही या बद्दल कांहीं तरी विचार होऊन पंडिता बाईच्या कृत्यास चांगली मदत देण्याची आमचे पुढारी मंडळी तजवीज करतील.

आज पर्यंत एकंदर पांच राष्ट्रीय सभा भरल्या त्यांत पांचवी राष्ट्रीय सभा मुंबई येथें भरली होती. मागील चार सभेपेक्षां या सभेंत विशेष महत्वाची व ध्यानांत ठेवण्या सारखी गोष्ट ही आहे कीं ह्या सभेनें आपला बहुतेक वेळ "कायदे कौंसिलची सुधारणा" या विषयाचा विचार करण्या कडे देण्याचा प्रथम ठराव केला व त्या प्रमाणें सभेनें आपला निमे वेळ ह्या विषयाचा विचार करण्यांत घालविला. खरोखर पाहिलें असतां आज कालच्या सुधारणा पैकीं सर्वांत मुख्य व इष्ट सुधारणा कायती ही होय. व बाकींच्या सुधारणा बऱ्याच अशीं ह्या सुधारणेच्या जयापजयावर अवलंबून आहेत. ही सुधारणा इष्ट आहे असें केवळ राष्ट्रीय सभाच म्हणते असें नाहीं तर आज पर्यंत जे व्हाईसराय होऊन गेले त्या पैकीं पुष्कळांनीं असें बोलून दाखविलें आहे कीं कायदे कौन्सिलची सुधारणा करणें अवश्य आहे व त्याजबद्दल इंडियांतील लोकांचें मागणें अगदीं रास्त आहे. लार्ड डफरीन साहेबांनीं आपल्या जाण्याच्या अगोदर थोडे दिवस जो एक मोठ्या महत्वाचा खलिता हिंदुस्थान सरकारांस पाठविला आहे त्यांत त्यांनीं असें म्हटलें आहे कीं, हिंदुस्थान सरकारच्या उदार राज्य नितींत कांहीं थोडीशी सुधारणा करण्याची वेळ आली आहे. ती अशीं कीं जे हिंदुस्थानवाशीं लोक आपल्या शहाणपणानें, विद्वत्तेनें, व वजनानें आपल्या देशबांधवाच्या भरवशांस पात्र ठरले आहेत ते राज्य कर्त्यांस आपापल्या हितहिताच्या गोष्टींत सल्ला देण्यास योग्य आहेत सबब त्यांचे देशाच्या राज्य व्यवस्थेत त्यांचें अंग असलें पाहिजे.

येणें प्रमाणें कायदे कौन्सिलची सुधारणा व्हावी म्हणुन शहाण्या इंडीयन लोकांचे मत आहे, लार्ड डफरीन साहेबा सारख्या राज्य कारस्थानीं राज्य कर्त्यांचे मत आहे व त्याच प्रमाणें मि. ग्ल्याडस्टन मि. ब्राडला, सर उईलियम वेडरबर्न, मि. केन, मि. जस्टीन म्याकार्थ, वगैरे उदार मनाच्या पार्लमेंटच्या सभासदांचे मत आहे. तर ही सुधारणा करणें आज स्थितीस योग्य नाहीं असें म्हणता येईल काय!

हें जेंवर महात्मे सांगितलें आहेत त्यांचें व त्यांच्या सारख्या इतर लोकांचें केवळ असें मतच आहे असें नाहीं तर ही सुधारणा करण्या करितां त्यांच्यानें देववेल ती मदत देण्यास ते तयार आहेत व त्या प्रमाणें देत ही आहेत. मि. ब्राडला साहेबांनीं ह्या करितां एक बिल तयार केलें आहे व ते येत्या पार्लमेंटांत सर्वांपुढें मांडणार आहेत. सदरहू बिल बऱ्याच पार्लमेंटाच्या सभासदाना पसंत पडलें आहे व त्यांनीं त्याला अनुमोदन देण्याचेंही कबुल केलें आहे तरी इतक्यानें आपलें कार्य साधेल असें नाहीं. पार्लमेंटांत असे पुष्कळ लोक आहेत कीं ज्यांनीं हिंदुस्थान कधीं पाहिला नाहीं व हिंदुस्थानची खरी स्थिती काय आहे हे अद्याप त्यांना चांगल्या मार्गानें कळलें नाहीं. हिंदुस्थानच्या बद्दल काय जी माहिती त्यांना मिळणार ती इकडील वर्तमान पत्रद्वारा मिळणार. व इकडील इंग्रजी वर्तमान पत्रांत राष्ट्रीय सभे बद्दल कसें लेख प्रसिद्ध होतात हें आपण नेहमीं पहातोंच आहों. अशी परंपरेनें त्यांना माहिती मिळाल्या मुळें इकडच्या स्थितीचें खरें स्वरुप यांना कळत नाहीं व त्यामुळें आपल्या पक्षांस बळकटी येत नाहीं. अशी स्थिती होऊंनये व आपण हातींधरलेल्या कृत्यास विनाकारण अपयश येऊं नये म्हणून मि. ब्राडला साहेबांनीं राष्ट्रीय सभेंत बोलतांना असें सांगितलें आहे कीं इकडून हजारों, लाखों सह्यानिशी पार्लमेंटाला अर्जे पाठवा म्हणजे तुमचे म्हणणें खरें वाटेल व कदाचित तुमच्या मागण्यास ही यश येईल व त्यावेळेस असें अर्ज पाठविण्याचे सर्वांनीं कबूल ही केलें आहे. परंतु त्या बदलची चळवळ अद्याप कांहीं फारशी सुरू झालीशी कोठें दिसत नाहीं. त्यांत निदान आमच्या वऱ्हाडांत तर अद्याप कांहींच नाहीं असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. असल्या प्रकारचे अर्ज तयार करून त्यावर हजारों किंवा लाखों लोकांच्या सह्या घेऊन विलायतेस पाठविणें म्हणजे कांहीं एक दोन दिवसाचे काम नाहीं. याला अवधी बरीच लागणार आहे. तर याबद्दल चांगला विचार करून आमच्या प्रांताचे कांग्रेस सेक्रेटरी स्तब्ध बसले असतील तर कांहीं हरकत नाहीं. कदाचित् इतर कामाच्या गडबडींत ह्या बद्दलचा त्यांना विसर पडूं नये. व ही आज दोन वर्षें या प्रांतांतील स्ट्यांडिंग कांग्रेस कमिटिची जी स्थिती आहे व जी व्यवस्था आहे तीच स्थिती व व्यवस्था अर्जांची होऊं नये. अशी आमची इच्छा आहे. इतर प्रांतांतील स्ट्यांडिंग कांग्रेस कमेटीच्या कामाशी व व्यवस्थेशी आमच्या प्रांतांतील कमेटीच्या कामाची व व्यवस्थेची तुलना करूं लागलें असतां आमचे प्रांतांत ही कमेटी आहे किंवा नाहीं याचा विचार पडणार आहे. तर आयते वेळेस अगदीं धावाधाव करण्या पेक्षां कांहीं थोडा वेळ आहे तोंच या कामास सुरवात केली तर बरें होईल अशी आमची सेक्रेटरीस व इतर मंडळीस सूचना आहे.

वरील मजकूर लिहीणें झाल्यावर व बें गाझीट वरुन समजतें कीं पार्लमेंट सुरु झालें आहे व हें बिल पार्लमेंटांत आणण्या बद्दलचा आपला हेतू ही मि० ब्राडला साहेबांनीं प्रसिद्ध केला आहे. यावरून वरील अर्ज वगैरे पाठविणें झाल्यास किती अवकाश उरला आहे हें उघड सांगण्याची जरुरी राहिली नाहीं.

The Berar Samachar
MONDAY FEBRUARY 17, 1890.

## A NEW TAX FOR THE AKOLA MUNICIPALITY.

If Akola is to have a decent water supply some method will have to be found out by which to get the funds necessary for the purpose. Unfortunately water here has to be brought from greater distances than those at Khamgaon and Amraoti; and consequently a larger outlay on the water works becomes necessary. We have also to profit by the example of one sister Municipality at Amraoti in the matter of the water supply being sufficient to cover the needs of the town all the year round even if the rainfall is scanty. That will also entail the necessity of spending a large amount initially with a view to secure a larger basin for water. In this way nearly three or four lacs will be required for the entire scheme to be realized. Then comes the question about the funds for this project. It is not within the limits of ordinary municipal expenditure; and the work must be done by special aid from outside. Our Municipality cannot be called rich and they manage in their present financial position to make the two and meet any how. There is no margin for anything out of the way. In this matter the municipality have, we think a right to go to

Government for a substantial aid With a large surplus every year in the Treasury we dont know why the Government should not be called upon to help the Committee in the matter. They helped the municipality at Amraoti by giving them three fourths of the cost of their water supply and we thing Akola can fairly claim as much. The Amraoti Municipality, it is true, has asked for further help for carrying out the drainage scheme there which is a great necessity there But there is no reason why Government should not help both the Municipalities when they have ample funds.

Government probably takes another view of the matter on the ground that water supply being a local convenience and a local benefit, the funds for the scheme must also be raised locally. If people want comforts they must pay for them. We admit this principle in theory but what we say is, that it cannot be practically applied to poor municipalities like those of Akola and Amraoti. The people are too poor and there are already local burdens that are felt as a hardship by the people on account of their inability to pay. Four lacs at 6 per cent per annum is 24,000 a year and another six thousand probably for the up keep and at least 10,000 a year to repay the principal is well nigh 40,000 Rs. a year—a sum larger than the whole income of the municipality here. It would thus appear that if the project of supplying Akola with water supply is really to be ever carried out, the Government must give a substantial aid by making us a free grant on the lines that they have given to the Amraoti Municipality, especially when Government have the wherewithal to make such a grant.

But even if the Committee gets a free grant of three fourths of the initial cost the remaining one fourth must be raised up locally. The debt represented by that one fourth, whoever lends it—Government or some body else, will have to spread over a reasonable number of years for repayment. And in that case the present Municipal income will not suffice and a fresh tax will have to be resorted to. We always know how the people are averse from any new tax, and how they would rather be without water supply than bear a further additional burden. But the tax will have to be imposed to raise the money for the repayment of the annual instalments. Then the question arises what tax to impose. There is a satta tax at Khamgaon which gives the local municipality a large surplus. It was originally laid on, we believe with a view to repay monies spent on water supply, with the consent of the leading satta dealers at Khamgaon. Of course if we got satta dealers here to consent to a satta tax, it would be very good; but the difficulty is to get that consent. We charge one per cent on their incomes from all sources to except agriculture, in the shape of our Police Patti, and then to charge them again on the sattas is unfair and unjust; because that is really taxing them twice over on the sources of their income. Then again to calculate on a Satta tax is directly to encourage that scandalous trade. Satta is speculation pure and simple and although Government does make out of Opium and Abkari a revenue that is no reason why we should also give an emphatic recognition to a vicious trade.

The only kind of taxation that appears to us to be likely to be fruitful and the least likely to be felt by the people is the Octoroi In Poona, Sholapur and in Nagpur and many other places we have an Octroi. People will probably object to this as to any other form of taxation but we believe under the present circumstances this seems to be the only one practicable. The usual objections to an Octroi that it becomes inquisitorial and the cost of collection is increased are not of much consequence. That the collection of the tax does not become an annoyance to people can be easily managed by making good rules as at Poona and Bombay. The burden on the poorer people should be removed by exempting articles of diet generally used by the poorer classes in the octroi shedules. Care will have to be taken that the Octroi does not really work as a transit duty. This can of course be secured by repaying the tax or a portion when any article brought within Octroi limits is again sent out. With the bringing in of Octroi, we think the Police Patti will have to be swept off. Octroi should if sanctioned be tried for a year and the number of articles subject to the Octroi might be gradually increased with a corresponding reduction in the Police Patti which as it is a direct tax is very hard to pay.

## SUMMARY OF CONGRESS RESOLUTIONS.

(Continued from our last issue.)

(*c*) That the tentative rules for the constitution and working of the Congress which were first considered at Madras, and in regard to which various addenda have from time to time been circulated, be thoroughly considered during the coming year by the several Standing Congress Committees, and definitely dealt with by the Congress at its next session.

(*d*) That this Congress does hereby confirm the appointment of sir W. Wedderburn. Bart, and messrs. W. S. Caine M. P. W. S. Bright Maclaren, M. P. J.E. Ellis, M. P. Dadabhai Naoroji and George Yule. as a Committee (with power to add to their number) to guide and direct the operations and control the expenditure of the national Congress Agency in England, and does further tender its sincere thanks to these gentlemen and to Mr. W. Digby C. I. E. the Secretary, for the service which they are rendering to India.

(*e*) That this Congress do formally appoint Mr. George Yule, Mr. A. O. Hume, Mr. Adam, Mr. Eardley Norton, Mr. Pherozshah Mehta, Mr. Surendranath Banerjee, Mr. Mono Mohan Ghose, Mr. Shurfuddin, Mr. R. N. Mudholker, and Mr W. C. Bonnerjee to represent its views in England and press upon the consideration of the British public the political reforms which the Congress has advocated.

(*f*) That a sum of Rs. 45,000 be raised for the expenses of the Congress Work in this country and in England during the ensuing year, and that the different Standing Committees do send their respective apportioned amounts to the General Secretary, the one half in three, and the balance in six months.

Resolution XIV.

Resolved...That the sixth Indian National Congress do assemble at some City in Bengal, the exact place to be fixed here after, on the 26th of December, 1890.

Resolution XV

Resolved...That the fifth Indian National Congress hereby tenders its heart felt thanks to its President, Sir William Wedderburn, as well for his ready sacrifice of personal and political considerations involved by his journey from England to India, as for that courtsy, impartiality and never failing sympathy which, characteristies of his long and honorable career as an official of this country, have marked his control of the proceedings of this assembly.

WILLIAM WEDDERBURN.
President of the fifth
Indian National Congress,
Bombay. December 31st, 1889.

## RULES

Rules for the regulation of the registration of births and deaths within the limits of the municipality of Khamgaon in Berar.

The following rules are made under section 116 (c) of the Berar Municipal Law 1886 for the registration of births and deaths within the limits of the municipality of Khamgaon in Berar.

Rule I On every birth of a child within the limits of the Municipality of Khamgaon in Berar, the father or the mother or a guardian of the child or in case of their absence or death or inability on account of sickness or other similar cause, any person living in the house in which the child was born, or any person who was present at its birth shall within 72 hours from the time of birth give information on the following points at the Municipal office or to the divisional member of the Committ in whose Division the child was born or to his peon or to the member of the Committee who has the care of the Conservancy and sanitation of the town or to the Conservancy Inspector.

(1) The division and the street of the Municipality in which the child was born.

(2) Names of its parents.

(3) Caste, occupation, and religion of the parents

[4] Sex of the child.

(5) Date of the childs birth.

(6) Whether the child was born alive or was still born, or whether having been born alive it died immediately after birth.

Rule II On every death within the limits of the Municipality Khamgaon in Berar a Member of the family to which the deceased belonged or in case of their being no such member or such member being unable on account of absence sickness or other similar cause any person living in the house in which the death took place, shall within 72 hours from the occurrence of the death, give information on the following points at the Municipal office or to the Divisional Member of the committee in whose division the death took place or to his peon, or to the Member of the Committee who has the care of the conservancy and sanitation of the town or to the conservancy Inspector.

[1] The division and street of the Municipality in which the death took place

(2) The name, caste religion, sex and age of the deceased

(3) The cause of death and how many days ill.

(4) The date of death.

(5) The occupation of the deceased.

Rule III. Any Municipal officer receiving information under rule I and II from any person shall, if required furnish him with forms in the form given in the appendix A to these rules and shall on the receipt of the information give a receipt to the person furnishing it in the form given in Appendix B.

Rule IV Whoever refuses or neglects to give information in accordance with rules 1 and 2 it being his duty under those rules to give information shall on conviction before a Magistrate, be liable to pay a fine not exceeding rupees 5

Appendix A

Serial No.
Name of division
Name of street
Names of parents
Caste occupation and religion of parents
Sex of the child
Date of childs birth
Whether child was born alive or was still born or died immediately after death
Name of informants
Signature of the informants
Remarks

Dated Khamgaon
189 Signature of Municipal officer

Appendix B

Serial No.
Name of division
Name of street
Name of the deceased
His caste religion and occupation
Sex
Age
The cause of death and how many days ill
The date of death
Name of informants
Signature of informant

Dated Khamgaon
189 Signature of Municipal officer

Appendix B

Receipt for having given information of birth or death.

Year 189

Khamgaon Municipality's Seal

No fee is charged for this receipt

Sheshachilum
Secretary
Khamgaon Municipality

Any person objecting to this shall put in his objections in writing with in 15 th March 1890 either to the undersigned or to the chairman of the Committee after the date specified the drafts will be taken into consideration by the Committee.

Sheshachilum
Secretary

## वऱ्हाड.

रा. रा. बाळकृष्ण काशिनाथ जोशी यांस मे० कमिशनर सा० नीं आपले क्लार्क आफ कोर्टचे जागी कायम केलें.

मि० गोविंदराज ए० अ० क० ह्यास्पानें जी तहशिलदाराची जागा रिकामी होईल ती वर रा० रा० बाळकृष्ण बळवंत सुळे बी. ए. आफिसिएटिंग तहशिलदार यवतमाळ हे कायम होतील असें ह्मणतात. आम्हीही हेंच इच्छितों.

असें कळतें कीं, रा० रा० बाळकृष्ण काशिनाथ जोशी यांच्या बदलीमुळें जी तहशिलदारीची जागा रिकामी झाली तीवर रा. रा. गोविंद गंगाधर दामले यांस कायम करण्याबद्दल शिफारस झाली आहे

यंदा उन्हाळ्या निमित्त दिवाणी कोर्टास ता. १ माहे मे पासून ता. १५ जून पर्यंत सुट्टी मिळणार आहे.

रा. रा. बाळा वल्द नारोबा पटवी राहणार अकोलें याची बायको नामें रेनुका ही कांहीं रोकड व डागिनें घेऊन शुक्रवारी पळून गेली असें कळतें.

## वर्तमानसार.

मि० चार्लस डिल्की–राष्ट्रय सभा "दि-प्राब्लेम्स आफ ग्रेट ब्रिटन" या नांवाचा एक भाग डिल्की यार्णी नुकताच प्रसिद्ध केला आहे त्यांत "प्रतिनिधियुक्त व्यवस्था बहुतेक हिंदुस्थानास देण्याचा समय येऊन ठेपला आहे" असें राष्ट्रीय सभेच्या संबंधानें डिल्की यार्णी लिहिलें आहे.

समुद्राच्या लाटांची उंची--अत्यंत सुक्ष्मपणानें पुष्कळ दिवस शोध केल्या वरून वादळानें समुद्र खवळला असतां लटांचीं उंची बहूत करून ४० फूट असते, पण वादळाचा वेग जास्त असला तर कधीं कधीं ६०।७० फुटांपर्यंत ही जाते.

सिंगाराणी खान.-- ही दगडी कोळशांची फार मोठी खाण निजामच्या राज्यांत आहे ४० चौरस मैल प्रदेशांत कोळसा २२० फूट खोली पर्यंत सांपडतो असें मासल्याच्या खाड्या वरून समजते, हा कोळसा विलायतच्या कोळशा प्रमाणें उत्तम आहे. कोळसा रेलवे वर नेण्यासाठीं ऱ्हाशी शाखा -- रेल्वे केली आहे. ह्या खाणींतून हल्लीं दररोज २९० टन कोळसा निवतो तो ४०० टण पर्यंत हल्लींच्या यंत्रांनीं निघण्या सारखा आहे. या खाणींत काम करणारे मजुरांस रोज एक रुपया, व वर काम करणारे मजुरांस ६ पासून आठ आणे पर्यंत मजुरी मिळते. जेथें पूर्वी इतस्तता २०।२९ झोंपडी होती तेथें आतां झनावा गांव बसला आहे. या खारखान्यास एक मोठे वर्कशाप जोडले आहे. खाणींत काम करण्याची हत्यारें त्यांत तयार होतात "डस्टकोल" "नटकोल" "फाइनुकोल" ह्यातीन जातीचा कोळसा खाणींत सांपडतो. यास अनुक्रम दर टणास तीन, साडेतीन, साडेसात रुपये अशी किंमत जाग्यावर पडते. हा कोळसा आगगाडीतून मुंबईस नेण्यास दरटणास दरमैली साडेचार पै भाडें रेलवे घेते. त्या मुळें मुंबईस येऊन तो २२ रुपये टण म्हणजे फार महाग पडतो दर टणास दर मैली साडे तीन पै भाडे घेतले असतां मुंबईस तो १८ रुपये टण प्रमाणें पडेल, दर टणा मागें निजाम सरकार स्वामित्व बद्दल ८८ आणे घेते वाडी स्टेशना पर्यंत निजामस्टेट रेलवेनें कोळसा येतो तेव्हा निजाम साहेबांनीं दर टणा मागें साडेतीन पै भाडे घेण्याचा ठराव केला असतां दुसऱ्या रेलवेंस तसें भाडें घेण्या विषयीं बोलण्यास बरें पडेल भाडें कमी होऊन कोळशाचा खप अतिशय होऊं लागला असतां दरसाल तीन पासून चार लक्ष टण पर्यंत कोळसा काढण्या सारखी तजवीज खाणीचे मालक करणार आहेत.

मोठी लबाडी--कृष्णा जिल्ह्याचे (मद्रास) कलेक्टर यांणीं गुप्त चौकशी केल्यावरून सरकारी कालव्याचे पाणी चोरून कित्येक जमीदारांच्या जमिनींस आज कित्येक दिवस देत आहेत असें समजतें या मुळे सरकारचें ९०,००० रुपये नुकसान झालें आहे. एवढी लबाडी इतके दिवस गुप्त राहिली या वरून देखरेखीचें काम अगदींच ढोंपळ होतें असेंच समजावयाचें कीं काय!

गव्हांचा पेरा— सगळ्या हिंदुस्थानांत २६५०८००० एकर जमिनींत गहू पेरला आहे असें सरकारी माहिती वरून समजतें.

धर्मसंबंधी निवड-- इंडिया आफीस मधून नुकतीच माहितीची पत्रके प्रसिद्ध झाली आहेत. त्या माहितीतलि सर्व धर्म संबंधी टिपणा वरून पुढील माहिती आम्हीं देतों.--

| | |
|---|---|
| हिंदु. | १८,७९,३७,४६८ |
| मुसलमान, | ९०,१,२१,९९९ |
| बौद्ध. | ९४,१८,८९९ |
| ख्रिस्ती. | १८,६३,८९९ |

मुंबईचे प्रख्यांत बारिस्टर मि० इनव्हिऱ्यारिटी हे मागल्या डाकेच्या आगबोटींतून विलायेतस गेले. शु० सू०

एका जहाजावरुन २४ हजार पौंड मसाला वगैरे सामान नाहींसें झालें आहे. जाहाजावर बाहेरचा कोण आला?

बजेट संबंधानें विशेष उहापोह व्हावा म्हणून यंदाचें बजेट ता० २० मार्च रोजी प्रसिद्ध करण्यांत येईल असे म्हणतात.

— सरकारी उपयोगासाठीं लागणारे सामान घेते वेळीं त्याचा जितका भाग हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत केलेला मिळेल तितके चांगले व या मुळें कदाचित् तें सामान किंचित् कमी प्रतीचें असलें तरी हरकत नाहीं अशा प्रकारची एक शिफरस हिंदुस्थान सरकारा कडून स्थानिक सरकारांस नुकतीच करण्यांत आली आहे.

रशियांत एक प्रकारची कुत्र्याची जात आहे त्यांतलि कुत्र्यास मुळींच भोकतां येत नाहीं.

गोड व सुवासिक आंबे करण्याची युक्ति— मोथा, आंवळे व वाळा हे पदार्थांत टाकून दूध चांगलें तापवावें मग तें पाण्यांत घालून त्यानें रोज शिंपण करावें म्हणजे किती ही खराब झालेलें आंब्याचें झाड असलें तरी त्यास तेजस्वी, गोड, सुवासिक, असें आंबे लागतात. दूध नसलें तरी कांहीं हरकत नाहीं. हे पदार्थ नुसत्या पाण्यांत जरी उकळून त्यानें शिंपणे केलें तरी आंब्यास चांगले मधूर व सुवासिक आंबे लागतात.

हिऱ्याचा –किल्ला हल्लीं लंडन शहरामध्यें पारिस शहरांतील एका कारागिरानें फ्रन्साम ध्यें नवीन बांधलेल्या एका किल्याचा हुबेहूब प्रतिमेचा एक हिऱ्याचा किल्ला बांधून आणला आहे. हा चाळीस हजार हिऱ्यांचा असून याला १८०० पायऱ्या आहेत याची उंची ४० इंच आहे. यांस तीन हजार मोतींही लागलीं आहेत हा किल्ला बांधण्याला त्या कारागिराला २३५०० तास लागले असें ते सांगतो.

काकडी, भोपळा, दोडका, पडवळ, घासाळे वगैरेचे वेल बरेच जुने झाल्यावर त्याच्या सांध्याच्या कांड्यावर गांठ बनते. त्या गाठींत सुक्ष्म छिद्र पाडून त्यांत पारा भरावा व त्याजवर चिकणमाती लिंपून वर चिंधी बळकट बांधावी म्हणजे त्या वेलास पुष्कळ फळें येतात याचा अनुभव कोणी घेऊन पाहील काय? न्या. सि.

—०००—

एक श्रीमान कंजूष राखणी करितां कुत्रा बाळगण्याचा खर्च पडूं नये म्हणून भोंकावयांस शिकला आहे!!

—*—

रम्या :– काकी रात्रीनें अगदीं फुगून गेली आहे.

काका :– अरे, थोडेसे पोटास लावाल सांग.

—०—

एका उंदरावर डोळा असलेलें दोन बोके, एकाघरांत दोन बायका व एका माशुकावर दोन आषक —ह्या तीघांचें कधींही पटावयाचें नाहीं.

—०००—

खोटे बोलण्या पेक्षां सबब सांगणें वाईट कारण, साबब गिरीनें खोटे बोलणें म्हणजे च सबब सांगणें!

—००—

सोम्या— मीं लावलेलें रोप किती झपाट्या नें वाढते आहे पहा!

गोम्या:— त्याला दुसरा काय उद्योग आहे

## जाहीरात.

आह्मी अकोले येथील कोटांत वकीली करण्यास सुरू केलें आहे. पक्षकारांचीं कामें माफक फी घेऊन काळजीनें करीत जाऊं. फिर्यादी व अपिलें इंग्रजींत व मराठींत लिहून देत जाऊं व सवडी प्रमाणें बाहेर गांवीं हीं कामें घेत जाऊं.

आमचे आफीस पेठेंत टाऊनहालाचे नजीक बाळकृष्ण अण्णाच्या वाड्यांत आहे.

ता० १६ जानेवारी १८९० } श्रीकृष्ण चिमणाजी देशपांडे वकील.

## पाक.

सालंमीश्री पाक घेतला असतां धातुची मजबुती होऊन शक्ती वाढते दर दिवस २ तोळे प्रमाणें ४९ दिवस घ्या.

बदाम पाक घेतला असता, मस्तकांतील उष्णता दूर होते डोळ्यास थंडावा येतो धातु पुष्ट होते बळयेते दरदिवस २ तोळे प्रमाणें ३० दिवस घ्या.

गोखरूचा पाक घेतला असतां मूत्र मार्गात होणारी आग, तिडका, जुनापरमा, मेहरोग मूत्र पुष्कळ आणि गढूळ होते तो तो, हे रोग दूर होऊन धातु शुद्ध होते बळ येते स्त्री संगाची इच्छा होते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ६० दिवस घ्या.

कोहळे फळाचा पाक घेतला असतां डोळ्यास येणारी अंधारी भोवळ पिताचे उपद्रव हे रोग दूर होऊन रक्तशुद्ध होते धातु पुष्ट होते बळयेतें दरदिवस २ तोळे प्रमाणें ४९ दिवस घ्या.

वर लिहिलेले पाक मागविण्याची रीत

| तोळे | किंमत रुपये | पोष्टेज |
|---|---|---|
| १६ | १ | ८९ |
| ३२ | २ | ०।३ |
| ४८ | ३ | ०।३ |
| ६४ | ४ | १०१ |
| ८० एकशेर | ५ | पोष्टेज माफ. |

पत्ता गजानन बाळकृष्णा वैशंपायन पेठ सदाशिव पुणें.—

## जाहीरात

ता. १९ माहे ज्यानेवारी सन १८९० इ० रोजीं अकोलें येथें जमेदार लोकांची सभा भरली होती. त्यांत वऱ्हाडच्या सर्व जमेदार लोकां करितां एक सभा स्थापन करणें इष्ट आहे असें ठरलें आहे. परंतु त्या संबधानें सर्वांचे मत घेण्या करितां पुनः जाहिरसभा भरवावी असें ठरल्या प्रमाणें वऱ्हाडचे जमेदार लोकांची जाहिरसभा रवीवार तारीख २३ मार्च सन १८९० रोजीं अकोलें येथें भरणार आहे. व त्या संबधानें निमंत्रण चिठ्या प्रत्येक तालुक्यांत सर्वांना पावत्या करण्या करितां पाठविल्या आहेत. तरी नजर चुकीनें किंवा इतर कारणामुळें जर एकाद्या जमेदारास चिठ्ठी पोचली नाहीं तर त्यास आमची सविनय अशीं प्रार्थना आहेकीं त्यांनीं आपणास बोलावणें नाहीं असें समजूं नये. व समाजास अगत्य येण्याचें करावें. व आपल्याच्यानें होईल तो मदत समाजास द्यावी कळावें हे विनंती

अकोलें ता. ११-२-८० गोविंद विश्वनाथ देशपांडे सभेचे सेक्रेटरी.

## जाहीरात

मेसर्स रायली ब्रदर कंपनीच्या शेगांवच्या शाखेस एक हजार टन वाळलेली व पांचशे ओली बाभळीची जळाऊ लाकडें तारीख १० जून सन १८९० पर्यंत मोजून व साठऊन देण्या बद्दलचे कंट्राट देण्या करितां टेंडरें मागविण्यांत येत आहेत. कंट्राट दिलेल्या मुदतीस पुरे करून दिले जाईल अशा खात्री करितां शेकडा दहा रुपये प्रमाणें अनामत रकम ठेवली पाहिजे.

टेंडरें पाठविण्याचे कागद मागविण्या करितां अथवा दुसऱ्या कांहीं माहिती करितां, मेसर्स रायलीब्रदर एजन्सी शेगांव ह्या पत्यावर पत्र व्यवहार करावा.

शेगांव तारीख १३ जानेवारी सन १८९०

सही इ. सो. रीच

### नोटीस.

नोटीस बेशमी गोविंदा वल्द नऱ्होबा पडके हल्लीं राहणार मौजे वीरखेड परगणे तळेगांव तालुके यवतमाळ जिल्हा वणी यांस भिकाजी वल्द तानबा पडके राहणार. मौजे मजकूर यांजकडून नोटीस देण्यात येते कीं मौजे मजकूर येथील गढी आमचे मालकीची आहे त्यांत माझे मालकीचे घर व कोठा आहे; तुम्ही आपले बापाशीं तंटा करून मौजे मजकूर येथें आमचे घरी राहण्यास आला, तेव्हां आम्ही तुम्हांस कोठ्यांत राहण्यास जागा दिली, असें असतां तुम्ही तो कोठा बळकावून बसला व तुम्हांस सोडून जाण्यास सांगितले असतां सोडीत नाहीं, करितां या नोटिशीनें तुम्हांस कळविण्यांत येतें कीं हा नोटीस पावल्यापासून एक महिन्याचे आंत कोठा खाली करून आमचे गढातून तुम्ही निघून जावे. तसें न केल्यास कायदेशीर रीतीनें इलाज करून तुम्हांस काढून देणें भाग पडेल, व या नोटिशीचा खर्च तुम्हांस द्यावा लागेल हा नोटीस दिला सही तारीख ९ माहे फेब्रुवारी सन १८९० इसवी.

( सही )

सहीची निशाणी भिकाजी वल्द तानबा याचे हातची खुद्द असे

☞ हें पत्र अकोला येथें कै. वाशी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
सहामाही " ३ " ०।८
सालअखेर " ७ " १।०८
किरकोळ अंकास..............................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०१

Rs.
per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly...........3 " 8 as
Single copy..................................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXIV AKOLA MONDAY 24 FEBRUARY 1890 NO 8

वर्ष २४ अकोला सोमवार तारीख २४ माहे फेब्रुवारी सन १८९० इ० अंक ८

## जाहीरात.

आह्मी अकोले येथील कोर्टांत वकीली करण्याचें सुरू केलें आहे. पक्षकारांचीं कामें माफक फी घेऊन काळजीनें करीत जाऊं. फिर्यादी व अपिलें इंग्रजींत व मराठींत लिहून देत जाऊं व सवडी प्रमाणें बाहेर गांवीं हीं कामें घेत जाऊं.

आमचे आफीस पेठेंत टाऊनहाला नजीक बाळकृष्ण अण्णाच्या वाड्यांत आहे.

ता० १६ जानेवारी १८९० } श्रीकृष्ण चिमणाजी देशपांडे वकील.

## जाहीरात

ता. १९ माहे ज्यानेवारी सन १८९० इ० रोजीं अकोलें येथें जमेदार लोकांची सभा भरली होती. त्यांत वऱ्हाडच्या सर्व जमेदार लोकां करितां एक सभा स्थापन करणें इष्ठ आहे असें ठरलें आहे. परंतु त्यां संबधानें सर्वांचे मत घेण्या करितां पुनः जाहिरसभा भरवावी असें ठरल्या प्रमाणें वऱ्हाडचे जमेदार लोकांची जाहिरसभा रवीवार तारीख २३ मार्च सन १८९० रोजीं अकोलें येथें भरणार आहे. व त्या संबधानें निमंत्रण चिठ्या प्रत्येक तालुक्यांत सर्वांना पावत्या करण्या करितां पाठविल्या आहेत. तरी नजर चुकीनें किंवा इतर कारणामुळें जर एखाद्या जमेदारास चिठ्ठी पोचली नाहीं तर त्यास आमची सविनय अशीं प्रार्थना आहेकीं त्यांनीं आपणास बोलावणें नाहीं असें समजूं नये. व समाजास अगत्य येण्याचें करावें. व आपल्याच्यानें होईल ती मदत समाजास द्यावी कळावें हे विनंती

अकोलें ता. ११-२-९० गोविंद विश्वनाथ देशपांडे सभेचे सेक्रेटरी.

## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस

वि. वि. आपण आपल्या पत्रीं खालिल मजकुरास येत्या अंकीं जागा द्याल अशी आशा आहे. गेल्या आठवड्यांत मी खानदेश प्रांतांत कांहीं कारणानें गेलों होतों माझा मुक्काम फिरतां फिरतां जामनेर तालुक्यांत परगणे शेंदुर्णी म्हणून एक जहागिरीचे गांव आहे तेथें झाला. तेथ असतां तेथून जवळच एक कोरीव लेणी प्रेक्षणीय आहेत अशी बातमी समजली नंतर एके दिवशीं शेंदुर्णी हून सायंकाळीं ५ वाजण्याचे सुमारास निघून ४ कोशावर वाकद या नावाचे शेंदुर्णीकर जहागिरदाराचें एक गांव आहे त रात्रौ मुक्काम केला. दुसरे दिवशीं उषःकाला पूर्वी पुनरपि पुढें जाण्याची सिद्धता करून वाट चालूं लागलों तों प्रातःकाळच्या अत्याल्हाद कारक थंडवेळीं फरदा पुरा पासून १ कोशाचे अंतरावर अजिंठ्याचा डोंगर आहे त्याचे पायथ्याशीं वाटसरूच्या उपयोगा करितां एक लहान बंगला बांधला आहे तेथें जाऊन दाखल झालों. त्या वेळीं तेथील शोभा फारच रमणीय होती. हवेंत थंडी असल्या मुळें अंगांच अंगाचे कोणते ही अवयव उघडे टाकण्याची सोय नव्हती. अशा वेळीं जवळ असलेल्या डोंगराच्या शिखरावर सहस्त्ररश्मीनें आपली तेजःपुंज प्रभा फकली. त्या वेळीं त्याचे आम्ही फारच आभारी झालों; कारण थंडीचें निराकरण करण्यास आतां संधी जवळ आली अशी आम्हास खात्री आली. बैल गाडी अगर टांग्यांचा रस्ता वर निर्दिष्ट केलेल्या गवती बंगल्या पर्यंत साधारण बरा आहे. पाचोरे स्टेशना पासून कोरीव लेण्यांचे अगदीं पायथ्या पर्यंत सडक करण्या विषयीं सरकारांतून हुकूम झाला आहे व त्या करितां रस्त्याची मोजणी वगैरेचे काम चालू आहे. त्या बंगल्या पासून आम्ही पायींच गेलों जातांना चढण नाहीं, किंबहुना मुळींच नाहीं म्हटलें तरी चालेल. एके ठिकाणीं मात्र अंमळ डोंगराची चढण आहे असें भासतें. एका बाजूस नदी वाहत असून दुसरे बाजूस डोंगराचा भयंकर देखावा आमचे मनांत किंचित भिति उत्पन्न करूं लागला. कारण आम्ही जात होतों ती वेळ प्रातःकाळच्या सूर्योदयाचीच असल्याने रात्र भर भक्ष्यार्थ शोधार्थ सर्व अटवीभर हिंडण्याचे श्रम निरसनार्थ किंचित विसावा घ्यावा म्हणून मृगराज कदाचित जलाच्या सान्निध्य असतील असा तर्क आमचे बरोबरील शिपायानें केला होता. परंतु मागें जावें तर तेथपर्यंत जाण्याचा उद्देश सफल होत नाहीं व त्यांशी दृष्टादृष्ट झाली असता पळून जाणें देखील निरुपयोगी असा मनांत विचार करून व परमेश्वराच्या साह्यावर हवाला ठेवून पुढील मार्ग आम्ही क्रमूं लागलों. सुमारे अर्धतास पर्यंत चालून क्षणभर सिंह दृष्टीनें मार्ग वळून पाहिलें. तों आम्ही अगदीं डोंगराच्या पोटांत आलों असें आम्हास वाटलें त्या वेळीं आमच्या बरोबर असणाऱ्या मनुष्यांस वाटलें कीं जर त्या शिपायाचा तर्क दैव दुर्विपाकानें खरा झाला तर मात्र आपली अगदीं त्रेधा उडून जाईल परंतु तसाच मनाचा धडा करून अगदीं लेण्यांच्या पायथ्याशीं आलों. नंतर पायऱ्या चढून वर गेलों तो प्रथमच एक भयंकर गुहा लागली त्या गुहेत सूर्य किरण अद्याप पोंहोंचले नसल्याने अंमळ अंधःकारच होता. तेथील भयंकर व ज्याचे अवयव छिन्न भिन्न केलेले आहेत अशा कांहीं मूर्ति पाहिल्या व फार अचंबा करीत राहिलों तेथें दोन विस्तीर्ण दिवाणखाने असून भिंतीचे बाजूस कांहीं टाक्या सारखे आहेसें वाटलें परंतु पाणी किती खोल आहे ते पहावें अशी जिज्ञासा झाल्या वरून पुढें गेलों तों आतून निवाऱ्या साठीं तेथें असणारे पक्षी वगैरे सर्व उडून गेले. त्या वरून तेथें जला भाव आहे असें आम्हीं ताडलें नंतर उजवे हाताचे बाजूस दोन मोठ मोठ्या गुहा आहेत तेथें गेलों त्यांना अली कडे दरवाजे केलेले दृष्टीस पडले. नंतर आत जाऊन पाहूं लागलों तों भिंती वरून व छता वरून मातीच्या रंगानें काढलेलीं चित्रें दृष्टीस पडलीं. तीं आम्ही फार सूक्ष्म दृष्टीनें पाहूं लागलों ह्या वेळीं ऊन चांगलें पडलें असल्यानें आम्हास पहाण्यास चांगलें सांपडलें. जस जसें आम्हीं आम्ही सुक्ष्मतेनें पाहूं लागलों तसतसें चित्रें काढणाऱ्यांच्या कौशल्याची तारीफ केल्यावाचून राहवेना भिंती व छत कोरीव असल्यानें त्याचो पृष्ट भाग चित्रें काढण्या लायक मृदु अथवा गुळगुळीत नसून किंचित आबड धोबड आहे. तेव्हां पूर्वीचे लोकांनीं यांवर चित्रें इतक्या सफाईनें काढिलीं कशीं सहजच प्रश्न उत्पन्न झाला. नंतर फार बारकाईनें पाहिल्यावर जेथें फुटलेला भाग होता तेथें पाहिलें तो कांहीं चिकण पदार्थाचा त्या आबड धोबड भागावर गिलावा करून त्याजवर मातीचीं चित्रें काढिलीं आहेत असें दिसून आलें. चमत्कार असा वाटला कीं रंगाची माती असून इतके दिवस टिकली कशी परंतु ती दृश्यमान आहे एवढेंच कायतें समाधान करून घेण्याला साधन होतें मग असें मनांत आलें कीं जर अशी कला पूर्वीं आमचे देशांत होती व जर ती उत्तरोत्तर नष्ट होत चालली आहे तर सरकारानें त्याचीं चित्रें कोणा तरी हुशार कारागिरा कडून कागदावर काढवून कां ठेवूं नये. म्हणजे पुढील पिढीच्या लोकांस आमच्या पूर्वजांत ही कला होती असें समजण्यास कांहीं तरी साधन राहील परंतु ह्या शंकेचें निरसन पुढें कांहीं वेळानें झालें तें असें कीं तेथें एक इंग्रजी लेख लिहिलेला आहे त्या वरून असें समजलें कीं सन १८७२ साला पासून सन १८८५ साला पर्यंत म्हणजे १३ वर्षे पर्यंत मुंबई सरकारानें एक पारशी गृहस्थ व त्यांचे हाताखालीं ३ हिंदु ( ड्राफ्टसमेन ) स्वतःचे पैसे खर्च करून त्याचीं चित्रें काढून ठेवविलीं आहेत. ( पुढें चालूं )

वऱ्हाडसमाचार.

मिती माघ वद्य ५ शके १८११

सरदिनशा पेटिट यांच्या तालीमखान्याचा पाया घालण्याचा समारंभाचे वेळीं मुंबईचे गव्हरनर लार्डरे "जनांनी शारीरशिक्षण" यावर भाषण केलें. तें हिंदुलोकांनीं चांगलें ध्यानांत ठेवण्या सारखें आहे. कारण अलीकडे विद्येमुळें हिंदुमुलांची शरीर प्रकृती फार बिघडत चालली आहे असें दृष्टोत्पत्तीस येत आहे. त्या भाषणाचा सारांश आह्मी आमच्या वाचकाकरितां मराठींत देतों. "सरकारला पक्कें वाटतें कीं हा तालीमखाना सर्व इलाख्याला नमुन्या दाखल होईल. आपल्याला जर उत्तम शारीर शिक्षण येथें मिळालें नाहीं तर त्याबद्दल सबब सांगण्याला जागाच नाहीं. जर्मनीनें अशा प्रकारची संस्था पहिल्यानें काढली. जेथें तालीमखाना नाहीं असें जर्मनींत एकही खेडें व शहर सांपडणार नाहीं. परंतु अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत ( युनायटेड स्टेटस ) याहीपेक्षां ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. सर्व जगांत उत्तम असा तालीमखाना " हे मेनवे तालीमखाना " होय. तो हारवर्ड युनिव्हरसिटीला जोडला आहे त्याला खर्च अडीच लाख रुपये लागला ह्मणजे हल्लीच्या तालीमखान्यापेक्षां थोडा जास्त लागला. तेथें नेहमीचीं कसरतीचीं साधनें खेरीज करून दांडपट्टा वगैरे खेळण्याला एक घर आहे तसेंच " हायड्रालिक रोइंग टॅंकस " आहेत ह्मणजे जेव्हां पाण्यांत वल्ही मारतां येत नाहींत तेव्हां त्यायोगें घरांत पोहतां वगैरे येते. या वरून मला एक आठवण झाली कीं या देशांत पाणी नेहमीं खुलेंच असतें तर आतां पोहण्याची शाळा काढण्याची वेळ आली आहे. तेथें खुशाल पोहण्याची कसरत करावी. पोहण्याचा एक फायदा हा कीं कांहीं इमारत वगैरे न बांधतां एकदम पोहण्याला आरंभ करितां येईल. पुढें याची गरज लागणारच म्हणून मी याचा उल्लेख केला. आतां या अमेरिकेंतील तालीमखान्यांत ज्या योगें शरीर बळकट आणि निरोगी होईल अशा प्रकारच्या सर्व कसरती होतात. जे विद्यार्थी कालेजांत पहिल्यानें जातात त्यांच्या शरीराची परीक्षा करितात आणि नंतर त्यांचे शरीर जेणें करून चांगलें विकास पावेल अशी कसरत त्यांना करायाला लावितात. अमेरिकेंत फक्त कालेजाला जोडलेल्या तालीम खान्याकडे २०००० रुपये खर्च होतो. ह्या वरून दिसून येईल कीं अमेरिकन लोकांनां शारीर शिक्षण किती महत्वाचें वाटतें दिसेंबर मध्यें युरोपिअन प्राथमिक शिक्षणाचा कायदा पसार झाला त्यांत कसरत आणि ड्राइंग ( चित्रकला ) हे विषय अवश्य लागू केले आहेत. अमेरिकेंत पुरुषांनाच कसरत शिकवितात असें नाहीं तर स्त्रियांना ही शिकवितात कारण पुरुषा पेक्षां स्त्रियांना कसरत अधिक महत्वाची आहे असें तें समजतात. आणि जे स्त्रियांना फार उच्च प्रतीचें शिक्षण नको आहे न त्यायोगें त्यांचीं शरीर प्रकृति खराब होते असें म्हणतात त्यांच्या करितां स्त्रियां करितां सर्वांत मोठें वेलस्ली कालेज

तेथें अशी व्यवस्था ठेवली आहे कीं शरीर प्रकृतिच्या संबंधानें एक प्रवेश परीक्षा ठेविली आहे. पुढें चालूं

---

नवीन जुडीशियल स्कीम अमलांत येऊन आज सरासरी ९ महिने झाले परंतु अद्याप त्या प्रमाणें व्यवस्था लागावी तशी लागली नाहीं. कामाची जी नेहमीं गैरसोय म्हणून वऱ्हाडांत असावयाची तशी अद्याप आहेच. या कोर्टाचें काम त्या कोर्टांत व त्या कोर्टाचे या कोर्टांत हा जो प्रकारचालू असे तो आहेच.व त्याच प्रमाणें एखादे कोर्ट कांहीं दिवस चालू राहावयाचे व लागलींच अधिकाऱ्यांनीं रजा घेतली कीं कोर्टाला व मुकदम्याला सर्व रजा मिळावयाची हाही प्रकार कांहीं बंद झाला नाहीं. या शिवाय इतर आणखी काय फायदे किंवा तोटे या रीतीनें झाले आहेत तें ह्मणण्या पूर्वीं कळविलेंच आहे नव्या व्यवस्थे पासून फाय द्या पेक्षां तोटाच बहुतझाला आहे असें ह्मणण्या स कांहीं हरकत नाहीं मागील जुलैच्या सुमारास रेसीडेन्सी जादा पत्रकाचा अगदी सपाटा लाग ला होता. त्यावरून प्रांतिक सरकारच्या मनां त या प्रांता बद्दल व नव्या कायद्याच्या अमलबारी बद्दल फार कळकळ उत्पन्न झाली आहे असें वाटलें होतें परंतु आतां पहावें त र सर्व पुनः पूर्ववत थंडच. मग त्या आठवड्यातच ह्याप्रांताच्या हवेंत कांहीं फेर पडला होता कीं काय कोण जाणे. नवीन कायद्या प्रमाणें अकोलें, खामगांव तेल्हारें व बडनेरा येथील स्मालकाज कोर्टांनां हजार रु. पर्यंत दावे चालविण्याचा अधिकार आला आहे. परंतु ह्या कोर्टावर जे अधिकारी नेमले आहेत त्यांना ५०० रु. पर्यंतच काम चालविण्याचा अधिकार आहे ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं ५०० रुपया पासून ते १००० रुपया पर्यंतचे दावे सबार्डीनेट कोर्टाच्या अधिकारांतून गेल्या मुळें त्यांना घेताच येत नाहींत व स्मालकाज कोर्टावर जे अधिकारी नेमले आहेत त्याना तितका अधिकार नसल्या मुळें ते चालविता येत नाहींत. व त्या मुळें प्रत्येक कोर्टांतून ५०० वरील पण १००० पर्यंतच्या स्मालकाजच्या सर्व फिर्यादी अद्याप शिलक पडल्या आहेत अलिशान रेसीडेंट साहेब ह्या लोकांना अधिकार देणार तरी कधीं.! या पेक्षां लोकांना फिर्यादी करू नका म्हणून सांगितलें तरी बरें होईल. रकम मुदती बाहेर जाऊन तेथें म्हणून आपल्या पदरचे आणखी १००।५० रुपये खर्च करून बिचारे सावकार लोक फिर्याद दाखल करितात. व कोर्ट ती फिर्याद ठेऊन घेऊन लोकांना खुशाल झोपा घ्यायाला सांगते. काय तरी व्यवस्था झाली आहे हा अधिकार येई पर्यंत वादी लोकांना रिणको जवळून द्याव्याचा रकम वसूल करण्यापूर्वी रिणकोचे ताब्यांत कांहीं ऐपत ही राहील कीं नाहीं या चा संशयच आहे. आपणावर फिर्याद लाविली आहे असें रिणकोला समजल्यावर तो आपली जिंदगी कायम ठेविल कीं नाहीं या चा मोठाच संशय आहे. तर ह्या लोकांच्या अडचणी कडे प्रांतिक सरकार दयार्द्रबुद्धीनें लक्ष्य देऊन कांहीं तरी व्यवस्था करतील काय?

## सेशन कोर्टाचा चमत्कारिक निकाल

तारीख १७ पासून येथें सेशन सुरू होऊन ता० २१ रोजीं संपलें. यावेळच्या सेशनांत एकंदर चार मुकदमे निकाल झाले. या चांहीपैकीं ३ खूनाचे असून एक खटला काय तो दरवड्याचा होता. व तो मुकदमा केवळ जास्त शिक्षा द्यावा ह्मणून हायकोर्टानीं ठरविल्यावरून सेशन कोर्टांत चौकशीस आला होता. या सेशनांतील चारही मुकदम्यांत काय तो एक आरोपी सुटला बाकीच्याना कोणाला काळेपाणी व कोणाला फाशी अशा शिक्षा झाल्या. तीन मुकदम्यांत जे ठराव झाले ते कांहीं वावगे झाले नाहींत परंतु अडगांव येथील मुकदम्यांत जो निकाल झाला व त्यांत आरोपी पुंजाजी नंबर २ चा याला जी फांशीची शिक्षा मिळाली ती अगदीं रास्त नाहीं व पुंजाजीला दोषी ठरविण्यास व ती शिक्षा देण्यास कायदेशीर रीतीनें कांहींच आधार नाहीं असें आह्मांस वाटतें. आरोपी पुंजाजीला जी शिक्षा मिळाली ती एखाद्या दुसऱ्या माजिस्ट्रेटाच्या हातानें मिळाली असती तर अह्मांला कांहींच वाटले नसते परंतु अबर्ट साहेबासारख्या न्यायी व कायद्यांमध्यें निष्णात अशा न्यायाधिशाच्या हातून ही शिक्षा देण्यांत आली हें पाहून फारच चमत्कार वाटतो

एकंदर मुकदम्याची हकीकत व सेशन कोर्टापुढें गुदरलेला पुरावा असा होता कीं अडगांव येथें ता० ९ माहे सप्टेंबर सन १८८९ इ० रोजीं केसर मारवाडणीचा दिवसा सुमार १०ते१२चे दरम्यान खुन झाला व तिच्या घरांत असलेली तिजोरी फोडून त्यांतील सुमार ४००० रुपयांचा जेवार चोरीस गेला. पुढें तपसा अंती ता० २४ सप्टेंबर रोजीं विठूनें प्रथम येऊन कळविलें कीं खुनाच्या वेळेस केसरच्या घरांत मी पुंजाजी, व तुकाराम असे हजर होतों. खून तुकारामनें केला. व त्यानेंच तिजोरीतून माल काढून नेला पुंजाजीला व मला तुकारामनें फसवून नेलें व एकदम त्यानें खुन केला व ही गोष्ट कोणाला सांगू नये म्हणून मला तुकारामनें ३७ रुपये दिले आहेत ते मी माझ्या आई जवळ ठेविले आहेत ते आणून देतो येणें प्रमाणें त्यानें सांगितलें व ते ३७ रुपये ही काढून दिले त्याच्या ह्या सांगण्या वरून पुंजाजी व तुकाराम यास ता. २४ रोजीं पकडले व कैद केलें पुढें पुंजाजीनें ता. १४ अक्टोबर रोजी माजिस्ट्रेटा पुढें असें कबूल केलें कीं खुनाचे दिवशी केसरच्या घरांत तुकारामनें मला नोटीस पाहण्या करितां जबरदस्तीनें नेलें. व तेथें आम्ही गेलो असतां केसर म्हणाली कीं ह्या खुंट्यांला खोबळे पडले आहेत तर तासून द्या व तसें करण्या करितां तीनें तुकाराम यास कुऱ्हाड दिली. खुंटा तासून दिल्यावर ती मी व विठोबा बसला आहे. तोच तुकारामनें तिच्या डोक्यांत एक घाव मारिला तर मी म्हणालो कीं अरे हें काय करतोस तर तो म्हणला चूप. नाहीं तर तुझ्या डोक्यांत हाणीन. व लागलीच आणखी दोन घाव हाणून तिचा प्राण घेतला. व नंतर तुकारामनें तिच्या पदरच्या किल्या सोडून तिजोरी उघडली व डागीनें काढून घेतले येणें प्रमाणें पुंजाजीनें सेशन कोर्टांत येई तो पर्यंत जबानी दिली. पुढें सेशन कोर्टांत त्याची जबानी झाली तेव्हां म्हणाला की मी दिलेली जबानी खोटी आहे व ती पोलिसानें मला मारलें व सोडून देतो असे म्हणाले म्हणून दिली. तुकारामनें प्रथम पासून नकार धरला तोच कायम ठेविला ह्या वरील मजकूराच्या जबान्या शिवाय सेशन कोर्टांत पुरावा झाला तो असा कीं खुनाच्या दिवशी आरोपी लोकांना केसरच्या घरांत ११ वाजतानां एका मनुष्यानें पाहिले व निघताना दोन मनुष्याना पाहिलें. ह्या दोन मनुष्यांनीं एका वेळेस पाहिले असून एकमकानीं एकमेकांस पाहिलें नाहीं. या शिवाय आरोपी विठूनें चोरीचा माल कांहीं लोकां समोर काढून दिला. या शिवाय आणखी कांहीं चिल्हर पुरावा झाला तो कांहीं विचार करण्या सारखा नाहीं व कोर्टानी सुद्धा त्याजवर व त्याच प्रमाणें ज्या दोन मनुष्यानीं आरोपी लोकानां केसरच्या घरातून निघतांना पाहिले त्याजवर कोर्टानीं भरवसा ठेविला नाहीं सबब आरोपी तुकाराम यास सोडून दिले.

आता ह्या वरील पुराव्या शिवाय पुंजाजीच्या विरुद्ध काय तो त्याच्या जबानीचा पुरावा आहे सदर्हू जबानी कबुल जबाब नाहीं असें कोर्टानीं व प्रासीक्युटर नीं कबूल केलें व इतक्या वरून एखाद्याला दोषी ठरविता येत नाहीं असें साहेबांनी कबुल केलें परंतु निकाल मात्र असा केला. अशा ठिकाणीं आरोपी सोडून देणें रास्त आहे अशा बद्दल पुष्कळ ठराव आहेत, ते साहेबांनीं पाहिलें व मान्यही केलें. तरी आरोपीच्या कम नशिबानें त्यांचे काय मध्ये फिरले असेल ते कांहीं सांगवत नाहीं. केवळ आरोपीच्या जबानी वरूनच त्याला शिक्षा द्यावी असें मानिले तरी त्यानीं खुन केला असें कोठे कबूल केलें आहे हल्लीच्या निकाला प्रमाणें जर निकाल होत गेला तर खुनाच्या वेळेस जो कोणी हजर असेल ते खुनी ठरेल असा कायदा करावा लागेल.

सदर्हू बद्दल अपील होणार आहे. पहावें आमचे हायकोर्ट काय करते ते हायकोर्टानीं जर हाच निकाल कायम ठेविला तर मग वऱ्हाड प्रांताचा कायदा इतर प्रांत तील कायद्या हून अगदीं भिन्न आहे असें मानणें भाग येईल.

---

**The Berar Samachar**

MONDAY FEBRUARY 24, 1890.

### REPORT ON EDUCATION.

(Continued from our 4th issue.)

1 There now remains a few points of the report to be thought of. We have yet to consider what the report says about the moral development of our young students. The Director assures us that in all classes of schools careful attention has, from the first been directed to this branch of education. Inspecting officers have been directed to look into the appearance the manners and the punctuality of the pupils. Text books have been specially prepared or selected with the view of conveying moral lessone "suited to the understanding of students at different stages of moral growth." And above all measures have been taken to see whether the teachers take sufficient advantage of these text bookt namely that of instilling moral principles and habits into the minds of their pupils. So far as these measures go they are in themselves good but how far the pious duty of moral training is fulfilled thereby the Report has not determined. Man was guarded on all sides by measures carried into effect by all seeing guards and yet he was tempted to vice by a small insignificant serpent. So in the art of teaching virtue skill does not lie so much in finding out measures as it lies in carrying them out. And we are very sorry that the Report is silent aoout giving out the results of their measures.

Again about an other important branch of human possessions namely health the Beraris are informed in a particular way. We have before us only numbers and visits— a statement which cannot *directly* throw any light upon the health of boys. Berar may possess 426 gymnasia or even more. These gymnasia again may be visited 395 times a year. But notwithstanding these the students are likely not to be increased in their physic. In every school regular hours must be set aside daily for physical exercises of students. And at the same time they should not be overburdened with studies; otherwise a student instead of gaining in his strength will break down in his health. And we have before us many complaints of this nature. We hear that the parents of many students are displeased with the present system of our Berar education for they say that their sons are going down in their *physical* and *mental* health because they are taxed with subjects that are beyond their comprehension and because they do not find time to enjoy the day consequently. If the parents themselves who are better judges are complaining this way we reluctantly say that we cannot agree with the report which testifies to the steady progress being made in physical education.

We have thus given the summary of the chief points of the report with our remarks thereon. We have now to say something about the Report in general. We have first said that the report is "full and interesting." But our expression is qualified. The report is full and interesting in a particular way. It sets forth statistics of the number of schools scholars and expenditure and so far it is full and interesting. But the report has altogether left some points out of consideration. If the report is to be tested according to the principles of utility then we say that it should inform the government as well as the public. And the report before us has done less service to the public. As an example we shall take moral training. The conduct of the boys must be reported to the parents. It is the parents who will take care to form the mind of their sons and to make it fit for the circumstances and condition in which they want to place their sons. It is necessary for the masters therefore to inform the parents about the conduct and misbehaviour of the pupils. We are of opinion that measures must have been taken to this effect by the authorities. But the Report does not make any mention about this kind of measure. And so the parents who wish to send their sons to school are altogether disappointed in not seeing any mention of such a measure.

(To be continued.)

### SIGNS OF THE TIMES.

Pandita Ramabai recently made a tour

through central Provinces and Berars and was received with all honour due to herself and the cause which she represents. Her reception at Amraoti by the people of the Town is an indication of the times. That a Christian lady preaching education of women in Hindu society, should be received well by all classes of people shows that we are living in times entirely different from those that preceeded us. There has risen in the heart of the nation a great desire to ameliorate their condition both social and political. The educated classes are especially interested in this onword movement. They believe that the National Congress will save them from all miseries attendant upon foreign conquest and that by making rapid progress in improving the social condition both of themselves and their women they would soon find themselves as ranked among the great nations of the world. This idea of raising Hindu woman has not only affected the Hindu people but it seems to have evoked sympathy in the minds of our European friends. Well so far as the thing goes it is all well. In this place we have only to look at the signs of the times. There is not the slightest doubt that the people are in right earnest. They do greatly desire to improve their political status. This was apparent from the way people behaved themselves in the Congress meetings all differences in opinion were done away with simply to secure unanimity with grand idea of raising India to a higher level in the scale of nations than it does at present. Hindu conceded what to their Mahomedan fellow subjects whatever they wanted. Mahomedans on ther hand (seeing that the Hindus did not desire self aggrandisment but rather were anxious for the good of the country, did away with their differences and joined the majority of the assembly. Again the people showed that they were in right earnest by contributing on the spot large sum of Rs. 65000. This shows that people of all classes residing in this country do really desire to secure rights which they consider to be essential for their existence as a nation.

The same desire for improvement is found in social questions. People do really desire the spread of female education, the raising of woman's status, doing away with differences of castes, encouraging of spirit of liberty in all matters, these things point to the fact that the people are in right earnest and nothing but realization of their idea will satisfy them. But there is one thing which appears defective in this ideal of theirs and that defect is likely to cause harm to the society at large especially in matters social. All that they desire is to have woman educated in respect of reading and writing but this desire is not coupled with the desire of creating in their minds a spirit of obedience to their Maker. The educated classes wish to have all that shines and glitters in appearance but they do not seem to care to have that which brings about real greatness to a nation. This important thing is religion. Unless a movement especially social is accompanied by something higher by something spiritual, it is not likely to be effective in any permanent manner. Religion is discorded and is considered as no great factor at all in social matters. This is the rock upon which there will be a shipwreck. Unless one is imbued with the spirit which actuated Budha or zoroaster, or Christ or Mahomed there will be all misery and puss.

SOME REFLECTIONS ON REPRESENTATIVE GOVERNMENT.
( Communicated )

The subject of Representative Government I think proper to take up because of the growing demand for representative institutions in India. The demand proceeds from importent centers of political association And the cry has been taken up and is being recelived from plat forms and in the Press. Already the government have kindly extended to us the right of electing a part of the members for our municipalities and Local Boards. The Congress is asking for the right of electing half the members of the Provincial Councils. And I have no doubt that the English government will favour us, some day or other, with all our just demands for representative institutions. The late Mr. Bright, in whom India loses one of her best friends and whose death we recently mourned, has said in one of his speeches that the English man takes with him wherever he goes representative institutions just as he takes with him his white skin. Already they have accompanied him to Canada and the colonies. And I see no reason why under favourable circumstances, they should not be planted in India. England is called the mother of parliaments. And as such she must be ever ready to fortor representative institutions, wherever she finds a congenial soil. This being so, it is incombent on us to understand the true nature of representative Government lest what we receive as a blessing may prove to be a curse No doubt, representative Government is ideally the best from of Government. But as Bacon says, the corruption of the best is the worst corruption. Before I proceed to deal with the various aspects of representative, Government I wish to lay one word, by way of criticisun, about the manner in which politics are handled by us. Every school-boy in the higher forms, every college student has his own opinions on the political questions of the day. They think they have every right and that they are fully equipped with all the requisites to criticise any political measure. To go to a higher class, every newspaper editor professes to be a politician and a politician of the first water. Now I do not question any one's right in the abstract to discuss Politics. But what I complain of is that in the first case viz. of stndents, men are brought too young to Politics just as Bacon complains men are brought too young to the study of Logic. In the second case viz. of editors my complaint is that these persons do not sufficiently furnish themselves with data have of ten no statistical information, and do not try to understand the scientific conditions of the problem And as a result of this what they give out in their papers are many times mere crude emperical, and hasty statements. I may illustrate this by a practical example. Of late the complaint was general, almost universal in the papers that Government was going to reduce the expenditure on Education, and naturally every person, interested in the cause of education viewed such a state of things with alarm. But, only the other day, in his Educational policy Lord Reay gave an effective contradiction to such assertions by announcing that the expenditure in education, instead of being reduced, had actually gone up from 12 to 16 lacs during the last three or four years. I would advise, therefore, those among us who profess to discuss Politics, in fact any question to be sure before hand that their assertions are borne out by facts and figures.

(To be continued.)

## वऱ्हाड.

मि. जी. एफ् प्रोव्हो, आफ० डे० कान्सरव्हेर आफ फारेस्ट, थर्ड ग्रेड, यांस आपल्या जागीं कायम केलें.

मि. एच्. गॉडवीन आस्टीन अ. क. फर्स्ट क्लास यांस आफि. स्पे. अ. क नेमलें.

मि. टी. एच्. सॉली यांनीं उमरावती क्यांपचे म्यु० कमिटीचे मेंबराच्या कामाचा राजिनामा दिला व तो मंजूर झाला.

मि. शेषराव रघुनाथ यांस वाशिमच्या म्यु० कमिटीचे मेंबर नेमलें.

रा. रा. नारायण केशव देशपांडे आफि. तहशिलदार बाळापूर यांस तिसरे वर्गाचे माजिस्ट्रेटाचे अधिकार मिळाले.

क्यापटन् आर. डी. सी. डेव्हिस अ. क. यास बुलडाणें जिल्ह्याचे डिस्ट्रिट रजिस्ट्रार नेमलें.

रा. रा. बाळकृष्ण बळवंत सुळे यांस वणी येथें आफि. तहशिलदार नेमलें.

रा. रा. एकनाथ मोरेश्वर, तहशिलदार, मलकापूर, याची खामगावास, मि. शाबासखां, तहशिलदार वणी यांची मलकापुरास आणि मि. सेशाचलम मुदलियार तहसिलदार खामगांव, याचीं मेहकरास बदली झाली.

रा. रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर ए. अ. क. यांस फर्स्टक्लास माजिस्ट्रेटचे अधिकार मिळाले.

गेल्या आठवड्यांत येथें हारवीचे कंपाउंडास आग लागून सुमारें पांच हजाराचे नुकसान झालें.

'नाशिककर संगीत नाटक' मंडळीनें मागील शनावारी 'संगीत इंद्रसभा' हा खेळ करून दाखवला. इंद्र, चंद्रकांत व अप्सर यांनीं आपलें भाग चांगले वठविले. गेल्या खेपे पेक्षां ह्या खेपेस पात्रांत बरीच सुधारणा केली आहे.

वऱ्हाड हायस्कूल ग्याद्रींगचे तर्फे ता० ६-७ मार्च सन १८९० रोजीं भारणारे समाजाकरिता पंडिता रमाबाई यांना बोलाविले आहे व त्या येथे तन्निमित्त येणार असें शुद्ध ऱ्हाडीपत्रांत प्रसिद्ध झाले आहे परंतु ही माहिती बरोबर नाहीं असें अह्मास आतां समजले आहे. ज्या एका विशिष्ट गृहस्थानीं बाईस अमंत्रण दिलें त्यांस तसें करण्यास ग्याद्रींग कडून योग्य अधिकार नव्हता असें अतां बाहेर पडले आहे. समाजा तर्फेचे अमंत्रण परत घ्यावे व बाईस त्याप्रमाणें कळवावें असें ठरल्याचि समजतें. असें जरी आहे तरी कांहीं सभ्य गृहस्थ बाईस त्याचवेळेस गावचे लोकांचे तर्फे बोलावणार आहेत व त्या त्याप्रमाणें आल्यास बाईचा हेतू कदाचित सिद्धीस जाईल.

वऱ्हाडातील जमेदार लोकांच्या सभेस जमेदारा कडून आलेल्या वर्गणीची रकमः-- रु

रा. तुरराव देशमुख देशपांडे जामटी रु. २६

रा. काशीराव पाटील पांडे पिंपळोद रु. १०

रा. प्रल्हाद विठ्ठल देशपांडे अजनगांव १०

रा. केशवराव माधव तर्फे रामराव साबुदेशपांडे इलीच पुर रु. १०

रा. बळवंत वामन देशपांडे मंगरूळपीर १०

रा. संपतराव परभतराव मुखत्यार जाह्नवा देशमुख मलकापूर १० रुपये

रा. नारायणराव गुलाबराव देशमुख रु. १०

रा. बळवंतराव देशपांडे मलकापूर रु. ५

रा. वासुदेव नारायण देशपांडे मलकापूर ५

रा. रानेउदाजीराव ऊर्फ गोविंदराव देशमुख पुसद रुपये २

| | |
|---|---|
| | ९७ |
| मागील अंकावरून रकम | १८७ |
| एकंदर | २८४ |

सेक्रेटरी

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं अकोलें मुनसिपाल कमेटीचे हद्दीतील बाजार कर वसूल करण्याचे हक्कांचा, स्लाटर हाऊसचा कमेटीचे हद्दीतील कचरा वाहून नेण्याचा, स्टेशन जवळील धर्मशाळेचा सन १८९०।९१ सालाकरितां लीलाव तारीख २४-३-९० रोजी सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत होणार आहे ज्यांस घेण्याविषयीं इच्छा असेल त्यांनीं सदरहु तारखेस हजर राहण्याची तजवीज करावी कळावें तारीख २२ माहे फेब्रुवारी सन १८९० इ०

Krishanaji Mulhar.
Secretary
Akola

## नोटीस.

सुकदेव वल्द नथमल राहणार कंचनापूर ता० अकोलें आणि राधाकिसन व मोहनलाल उभयता अज्ञान पालन करणार मातोश्री प्यारीबाई मर्द नथमल राहणार निमकर्दे ता० बाळापूर यास खालीं सह्या करणार याजकडून कळविण्यांत येतें तें. ता० ३०-५-८८ चे उभयतांनीं अह्मांस लिहून दिलेले करारनाम्याप्रमाणें उभयतांचे वादीचे अखेर निकालाचे सुनावणीची ता० २ मार्च सन १८९० रोज रविवार दिवस मुकरर केला आहे तरी त्या दिवशीं तुह्मी अकोले येथें गोटीराम सुरजमल याचे दुकानीं दिवसा आठवाजतां अह्मां पंचापुढें हजर व्हावे. तसे न कराल तर रीतीप्रमाणें निवाडा केला जाईल मग उभयताचया तक्रारी ऐकल्या जाणार नाहींत कळावें तारीख २२-२-९० इ०

( सह्या )
१ तनसुकराय
१ भीवराज
१ संभुराम
१ जमनादास
१ धनराज
यांच्या तर्फे मुखत्यार जमनादास गिरधारीलाल.

## वर्तमानसार.

लंडन येथे एका बाईचे दांत पडले असल्यामुळे तिनें एक खोट्या दातांचा जोड बसविला होता. एके रात्रीं ती निजली असतां तो जोड तिच्या घशांत जाऊन श्वासोश्वास कोंडून तिचा प्राण गेला कृत्रिम दांत बसविणाऱ्यांनीं इकडे लक्ष द्यावें.

० ठा० अ०

एक विलक्षण नवे शोध लावणारा एका प्रकारच्या विजेच्या कंदिलाच्या प्रकाशाने ढगावर जाहिराती प्रसिद्ध करण्याकरितां मोठमोठ्या व्यापाऱ्याकडून भांडवल जमवित आहे.

हैद्राबाद येथें जी नुकतीच एक सोडत झाली तींत ११, १, ५७, ४९, २६९, आणी ९०, ४, ९०, हें बक्षीस मिळाल्या पैकीं पहिले तीन नंबर आहेत. पहिल्यास सव्वीस हजार बक्षीस मिळाल आहेत.

एक दीड शहाणे एका गणीत्यास विचारतो "दोन गावठळ डुकरांचे जर एक मण वजन तर एका रान डुकराचे किती"? गणिती ह्मणतो 'ताजव्यांत बसा ह्मणजे सांगतो'! !

मेल्यावर तरी आपल्या कपाळची भिक चुकावी ह्मणून एक पंडीत आपल्या आयुष्याचा विमा उतरण्याच्या खटपटींत आहेत.

प्रजा प्रेम-तटबंदी.—सर चार्लस डिल्की यार्णी "दिप्राब्लेम्स आफ ग्रेटर ब्रिटन" नामक जे पुस्तक प्रसिद्ध केलें अ.हे त्यांत "सरहद्द वाढवून बळकट करा, कडी निकडीच्या वेळीं उपयोगी पडण्या कारितां फौज जास्त ठेवा, रशिया हिरातेंस येऊन पोंचला म्हणजे त्यास हिंदुस्थानवर सहज येतां येईल" अशी सूचना ब्रिटिश सरकारास केली आहे "आर्धी तारें त्यांत शिरलें वारें" अशीच ही गोष्ट झाली आहे. सर चार्लस डिल्की हे मोठे जंगी मुत्सद्दी आहेत हे तूर्त प्रधान मंडळांत नाहींत तरी त्यांच्या शद्वास इंग्रज लोक फार मान देतात एकाद्या भयाभीत सशा प्रमाणें हिंदुस्थान सरकार रशियास हिंदुस्थानावर स्वारी करितां येऊंनये म्हणून सरहद्द बळकट करण्या साठीं मनस्वी पैसा मातींत घालीत आहे, त्यांत डिल्की यार्णी आपल्या लेखानें या कृतीस मोठाच जोर दिल्या प्रमाणें झालें आहे तेंव्हां आतां सरहद्द बळकट करण्या साठीं किती ही पैसा उधळला तरी तो वाजवी असेंच ठरणार यांत संशय काय? सरहद्द बळकट करण्यासाठीं ४० कोट रुपये खर्च करण्याची आंतल्या आंत धामधूम चालली आहे असा इंडियन स्पेक्टटरच्या विलायतच्या बातमी दारानें एक लेख लिहिला होता.

शिलकेचा योग्य विनियोग- गतवर्षीच्या सरकारी अंदाजांत १० लक्ष रुपये शिलक राहिल असा फडणिसानीं अजमास धरला होता पण झालेल्या नक्की जमेचे आंकडे पाहिल्या वरून ती शिलक सवा कोटी रहाते असें बाहेर आलें आहे. ही शिलक सर हद्दीच्या बळकटी साठीं मातींत न घालतां मिठावर वाढविलेला कर हलका करण्याकडे खर्च करावी अशी सूचना जी. व्ही जोशी यार्णी वर्तमान पत्रांतून केली आहे. ही सूचना फार प्रशंसनीय आहे असें आम्हास वाटते. मिठावरचा कर वाढविल्या मुळे प्रजा फारच माफक मीठ खाऊं लागली आहे दारिद्रा मुळें पुष्कळ गरीब लोकांस असें महाग मीठ घेऊन खाण्याचें सामर्थ्य नाहीं ह्या मुळें मिठाचा खप ही कमी होऊं लागला आहे. मीठ दुर्भिळ झाल्यामुळें, व तें लोकांच्या खाण्यांत कमी येऊं लागल्या मुळें, लोकांस नाना प्रकारच्या व्याधी जडत आहेत, शेतकीच्या जनावरांस मीठ मिळत नसल्या मुळें त्यांचा ही नाना प्रकारच्या रोगानें भयंकर संव्हार होऊन शेतकऱ्यांचे अत्यंत नुकसान होतें. पण पैशा पेक्षां रयतेच्या जनावरांच्या प्राणाची किंमत सरकारास अधीक वाटत नसल्या मुळें सरकार अगदीं निष्ठुर झालें आहे. इतकेंच नव्हे पण मिठावरील जकात वाढविल्या मुळें मीठ कमी न खपतां पूर्वीच्या इतकेंच खपत आहे असें मोठ्या डौलानें दाखविण्याचे ही सरकारास वाईट वाटत नाहीं ह्या निष्ठुर पणास काय म्हणावें?

रशियानें सैबिरियांतील फौज पुष्कळ वाढविली म्हणून चीन सरकारानें आपली फौज मांचूरियाच्या सरहद्दीवर जमविली आहे असें स्ट्यांडर्ड पत्राचा शांघाईचा बातमीदार कळवितो.

कापुरास तेजी-- जर्मन सरकार बिन धुराची दारू करण्या कडे कापराचा उपयोग फार करितें. जपान, चीन आणि संडा बेटें ह्या ठिकाणी कापराची चणचण उडाल्या मुळें तेथें त्याची दुप्पट किंमत झाली आहे.

शु० सू०

—राजा सर. टी. माधवराव यांचा राष्ट्रीय सभेचे पुढाऱ्यांस उपदेशः— "तुम्ही इंग्लंडांतील मोठमोठ्या मुत्सद्यांकडे जा, आणि त्यांनां म्हणा कीं, आपल्या कडून आम्हांस इतकें शिक्षण मिळालें; आतां आम्हास आमचे राज्यकारभारचें थोडं शिक्षण द्या, कसें ही करुन तुमचें शहाणपण तुमचें न्याय व तुमची परोपकाररीत आम्हांस शिकवा."

आस्ट्रेलियांतले एक गृहस्थ म्हणतात कीं मोठ-मोठ्या शहरांतून रोग उद्भवतात याचें कारण शहरांतील कचरा किंवा घाण हें नव्हे. तर तेथील लोक गारपाणी पितात हें होय. यांचे मते शहरांतील लोकांना नेहमीं पाणी कडकडित करून मग ते निववून प्यावे असें आहे या आपल्या म्हणण्यास ते पेकिन शहराचे उदाहरण देतात. स्वच्छतेच्या संबधानें हे शहर अतिशय घाणरडे असून त्यांतील लोक नेहमीं पाणी काढवून पितात, म्हणून बहुतेक लोक निरोगी असतात.

ठराव— सरकारच्या सनदी ग्याझेटेड कामदार मंडळीनें लोकांस कर्जाऊ पैसा देऊन व्यापार करूं नये असा सरकारचा पूर्वीचे ठराव झालेला आहे; परंतु इतर नोकर नातलगांच्या मार्फत किंवा गुमास्त्या मार्फत लोकांस कर्जाऊ पैसा देतात, असें सरकारच्या नजरेस आल्या वरून हा प्रकार बंद करण्या करितां सनदी-कामगारास लागू केलेला ठराव सर्व बिनसनदी नेटिव नोकरांस ही आता लागू करण्यांत आला आहे. सरकारी नोकरापाशीं जरी पैसे असले तरी जर यांस चाकरी हावी असेलतर त्यास देव घेवीचा धंदा ह्या ठरावा मुळें बहुतेक सोडूनच दिला पाहिजे.

कुत्र्याचे विषावरील उपचार--पिसाळलेलें कुत्रें चावल्यास तावडतोब त्या जखमे वर ब्रांडी ( दारू ) ओतून जखम साफ धूवून टाकावी. म्हणजे रक्त वाहिन्यांत विषाचा प्रवेश होण्याची भिति दुर होते, असें एका मिशनरी गृहस्थांनीं स्वनुभवा वरून प्रसिद्ध केलें आहे. मात्र उपचार तावडतोब अमलांत आला पाहिजे.

चमत्कार—इंदूर शहरीं गोरक्षणाच्या संबंधानें गडबड झाली त्याच संबीस येथील रुट्र सागराजवळील एका दोमजली घरावर एक गाय चढून गेली! ही कशी गेली या संबंधानें कोणाचाच तर्क चालत नाहीं.! दोन दिवस पावेतों त्याच टापऱ्यावर होती. गुडघ्या पावेतों पाय ही त्या टापऱ्यांत घुसले होते! तिसरे दिवशीं घराच्या मालकानें १०-१९ मनुष्यांची मदत घेऊन सदर गाईस वरून खालीं घेतलें. हा काय चमत्कार असेल तो असो.

तिसऱ्या वर्गाच्या उतारूंस लांबच्या प्रवासांत कमी भाडें पडावें अशा बद्दलचा एक लेख मि. गॉस्ट्लिंग ह्यांनीं कलकत्ता रिव्ह्यु मध्यें प्रसिद्ध केला आहे. मि गॉस्ट्लिंग ह्यांची सूचना रेल्वे कंपन्यां कडून सरकारानें अमलांत आणविल्यास गरीब व धार्मिक लोकांस दुरदुरच्या यात्रा मात्र करण्यास सुलभ होईल, यांत संशय नाहीं.

हल्लीं परिस शहरांत अशा घोड्याच्या गाड्या निघाल्या आहेत कीं, त्यांत ठेवलेल्या एका यंत्रा वरून गाडी किती मैल चालली हें तेंव्हांच लक्षांत येतें, व तितक्या अंतरा बद्दल गाडी वाल्याला भाडें द्यावयाचें हें ही कळतें.

न्या० सि०

हिंदुस्थानांतील तोफखान्यांत विशेष प्रकारची व्यवस्था करण्याचा हुकूम सुटला आहे असें म्हणतात.

पोर्तुगालमधील इंग्लिश जातीच्या कारकुनास फाटा मिळाल्यामुळें त दारोदार भीक मागत आहेत.

हिंदुस्थानचें वार्षिक बजेट मार्च महिन्याच्या २१ व्या तारखेस कौन्सिल पुढें ठेवण्यांत येईल व त्यांवर वादविवाद ता. २८ रोजीं सुरु होईल.

हिंदुस्थानच्या रेल्वे संबंधानें जें एक बिल पुढें आलें त्याचा विचार करण्या करितां एक सिलेक्ट कमेटी नेमण्यांत आली असून त्याचा रिपोर्ट इतक्यांत बाहेर येईल हें बिल ता. २१ मार्चच्या आंत कौन्सिल पुढें येऊन पास होईल असा अदमास आहे.

मुंबईस इंडियन फायर इन्शुअरन्स कंपनीचे दिवाळे निघालें.

मुलतानच्या किल्यातील कैद्यांनीं तेथील जेलराचें नाक कापिलें आहे.

कुत्राचा दंश जनावरासही होतो असें म्हणतात.

जर्मनीचा राजा लवकरच फ्रांसांत जाणार आहे.

अलाबाद हायकोर्टाचे जस्टिस टिरेल यांणी रजा घेतल्यामुळें त्याच्या जागीं क्नास्थवेट याची नेमणूक झाली.

हली कलकत्यास लटक्या लढाईची ज्या रितीनें गडबड चालू आहे. हुगळीनदीच्या किनाऱ्यावर असणाऱ्या सर्व किल्यावर लष्करी शिपाई तुरुंगावर ठेवण्यांत आले असुन ते किल्ले सर करण्याची लटकी लढाई सुरु झाली आहे प्रथम डायमंड बंदरावर ही लढाई सुरु होईल. फत्ते येथे होऊन बाकीचे किल्ले एका मागून एक सर करण्यांत येतील.

महू येथील जनावरांचे प्रदर्शन पाहण्यकरतां होळकर महाराजांची स्वारी मुद्दाम गेली होती.

बिलासपूर राय ड रेल्वचा फाटा इतक्यांत सुरु होईल.

हस्तीदंताखातर दरसाल फक्त आफ्रिकेंत पासष्ट हजार जिवंत हत्ती मारले जातात. आणी सुमीर बारा लाख रुपये त्या पासून उत्पन्न होतें!

विमान उडविणारी हिंदुकंपनी या नांवाची एक कंपनी वाडी नरशिंह येथे निघाली आहे तिणें ता० २ रोजीं विमान उडविण्याचा खेळ दत्ता प्रित्यर्थ मोफत करुन दाखविला एक भला उंच तंबू केला आहे, आणि त्यामध्यें एक विमान करून ठेविलें आहे; तें खुर्चीच्या आकाराचे आहे जवळच एक खांब असून त्यांत कळ केली आहे; त्यानें विमान १०-१२ हात उंच चढतें चित्रें वगैरे करून बरीच त्याची शोभा आणिली आहे, व पडदे चांगले आहेत यांनीं एकंदरीत ह्या कंपनीनें हीं एक नवीन चीज खेडे गांवच्या लोका साठीं केली आहे. ही कंपनी चिंचली पर्दशनास गेली आहे, ह्या विमानाचे प्रकरणीं लाघ २०० रु० खर्च झाला आहे, ह्या कल्पनेचे श्रेय एका तांबटास आहे.

विलक्षण बंधू प्रिती—रा. रा. कृष्णराव वागळे सतवास्याचे जाहगीरदार हें कोकणांत दोन चार दिवसांपूर्वीं वारले त्यांचे वडील बंधू रा. रा. भैया साहिब वागळे यांस दुखकारक वार्ता कळतांच त्यानींही लगेच प्राणत्याग केला.

# नोटीस.

आलीशान रेसिडेन्ट बहादुर यांची जाहीरात नंबर २५६ तारीख १९ माहे दिसेंबर सन १८८८ ह्यांतील नियम ३२ प्रमाणें निवडलेले सभासदांपैकीं एक त्रितीअंश सभासद चिठ्या टाकून तारीख १ माहे एप्रील सन १८९० ई० पासून खाली जाहलेले आहेत ते येणें प्रमाणें.

वार्ड नंबर २ ( गोळीपुरा, फाटकपुरा, आणि भुसारा. ) मि. एच. सी. म्याकींटर साहेब. वार्ड न. ३ [ पेठ. ] मि. केशव घनःश्याम. वार्ड नंबर ५ ( सुटाळ पुरा आणि डुबाडपुरा. ) मि. वामनजी होरमसजी.

ह्या रिकाम्या होणाऱ्या जागा भरण्या करितां सभासदांची निवडणूक तारीख १ माहे मार्च सन १८९० ई० रोजी प्रातःकाळीं ७ वाजतां म्युन्सीपालटीचे आफीसांत होईल.

वरील जाहीरातींतील नियम १३ प्रमाणें निदान निवडनुकीच्या पूर्वी ७ दिवस लायक उमेदवार होऊं ईच्छीणारे इसमानीं आपण उमेदवार असल्या बद्दलचा कागद बगैरे मेहेरबान एक्स्ट्रा आसिस्टंट कमिशनर. खामगांव याजकडसें द्यावा व ते कलम १४ प्रमाणें निवड नुकीच्या ठिकाणीं राहून मत दाखल करतील.

प्रत्येक वार्डी करितां जितक्या जागा रिकाम्या जाहाल्या आहेत त्या भरण्या करितां मत देणाराणी आपआपल्या वार्डी करितां मत देण्या करितां नेमलेल्या दिवशी येण्याचे करावे

ज्यास्त माहिती लागल्यास म्युनसीपालटीचे आफीसांत मिळेल.

Anapt Parasuram

१६-२-९०. सेक्रेटरी म्यु० क० खामगांव

# पाक.

सालंमीश्री पाक घेतला असतां धातुची मजबुती होऊन शक्ती वाढते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ४५ दिवस घ्या.

बदाम पाक घेतला असतां, मस्तकांतील उष्णता दूर होते डोळ्यास थंडावा येतो धातु पुष्ट होते बळ येते दरदिवस ३ तोळे प्रमाणें ३० दिवस घ्या.

गोखरूचा पाक घेतला असतां मूत्र मार्गांत होणारी आग, तिडक, जुनापरमा, मेहरोग मूत्र पुष्कळ आणि गढूळ होते तो तो, हे रोग दूर होऊन धातु शुद्ध होते बळ येतें स्त्री संगाची इच्छा होते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ६० दिवस घ्या.

कोहळे फळाचा पाक घेतला असतां डोळ्यास येणारी अंधारी भोवळ पिताचे उपद्रव हे रोग दूर होऊन रक्त शुद्ध होते धातु पुष्ट होते बळ येतें दरदिवस ३ तोळे प्रमाणें ४१ दिवस घ्या.

वर लिहीलेले पाक मागविण्याची रीत

| तोळे | किंमत रुपये | पोष्टेज |
| --- | --- | --- |
| १६ | १ | ०९ |
| ३२ | २ | ०१३ |
| ४८ | ३ | ०१३ |
| ६४ | ४ | १०१ |
| ८० एकशेर | ५ | पोष्टेज माफ. |

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन पेठ सदाशिव पुणें.—

हें पत्र अकोला येथें कै. बाबाजी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.